# सागर-सरिता

बालसाईभक्तांनो, पाळण्यामधील आपल्या निरागस बालकाला त्याची आई अंगाई-गीत मोठ्या प्रेमाने आळवित असते. त्यामागे तिचा उद्देश हा असतो की त्यामुळे बालकाच्या हृदयात सुरुवातीपासूनच प्रेम रुजावे. आईची ही बालकासाठी निष्काम सेवा होय! प्रेम हा निष्काम सेवेचा आतमा आहे. प्रेमाला पारितोषिकाची आस मुळीच नसते. अंगाई-गीत हृदयाच्या भाषेत रचविलेले असल्यामुळे त्या गीतातील शब्द प्रेमाने न्हावून निघालेले असतात. या गीताची रचना म्हणूनच सरळ, साधी, सोपी, सहज अशी ओघवती असते.

रामायण, महाभारत, श्रीमद्भगवद्गीता यांसारखे आपले महान ग्रंथ काव्यात लिहिलेले आहेत. अगदी मोजक्या शब्दात मोठा आशय काव्यामध्ये भरलेला आढळतो. नेहमीच्या व्यवहारातील साधे विषय आकर्षकरीत्या मांडून वाचकांच्या मनावर स्पष्टपणे ठसविणे हे काव्याचे वैशिष्ट्य होय!

श्री साईबाबांच्या चरित्रावरून असे दिसते की बाबा भक्तांशी बोलताना मातेच्या ममतेने बोलत असत. त्यांचे बोल हृदयाची भाषा बोलत असत. पुरुष, स्त्री व इतर लहानथोर भक्तांना बाबा हाक मारीत त्यामध्येसुद्धा त्यांचे प्रेम ओतप्रोत भरलेले असे. बाबांचे बोलणे म्हणजे एकप्रकारचे काव्यच असे.

श्री साईबाबांच्या चरित्रावरून असे जाणवते की बाबांना आवड-निवड अशी नव्हती. तरीही कोणतीही गोष्ट ते त्यात आवड दाखवून करीत असत. जीवनात घडणाऱ्या सर्वच गोष्टी आपल्या आवडीच्या असतातच असे नाही. तरीसुद्धा प्रत्येक गोष्ट घडत असताना आपण त्यात आवड उत्पन्न केली तर त्यात कटुता रहात नाही, हेच यावरून बाबांना सांगायचे आहे. श्री साईबाबांच्या शिकवणुकीतून जे जे शिकावयास मिळाले ते खालील "सागर-सरिता" या रूपक काव्यकथेत गुंफविण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. बालसाईभक्तांनो, बाबांची ही शिकवण आपण प्रत्यक्ष आचरणात आणल्यास आपण नक्कीच सुखी होऊ.

ध्येय आपुले ठरवुनि घेई
बाळगी ते ध्यानात।
संथ वाहते पावन गंगा
आपुल्या आनंदात॥१॥

निरोप घेता मायपित्याचा
गहिवरली कंठात।
आठव येता कर्तव्याचा
केली भावनेवर मात॥२॥

हृदयाची मग चाले भाषा
निरूपम स्तब्धपणात
नि:शब्दाने निरोप घेता
अश्रू दाटले नेत्रात॥३॥

आशीर्वाद तो मायपित्याचा
जतन करूनी हृदयात।
प्रेम तयांचे सोबत असता
भय ते कसले त्रैलोक्यात॥४॥

मार्गी कुणी भेटता
पुसे न जात-पात।
आदर्श दावि समतत्त्वाचा
विनम्र अभिवेशात॥५॥

वाटेमधले खाचखळगे भरता
न घेई कुणाची साथ।
उणीव कुणाची खपे न तिजला
जणु प्रेमाची बरसात॥६॥

देण्यासाठी हात तियेचा
न हात पसरी जनात।
शुद्ध मनाचि प्रेमळ सरिता
मग्न सदा ध्येयात॥७॥

सागराचे गान गाता
निसर्ग सौंदर्यात।
भरून येतसे ऊर तियेचा
जणु भक्तीचा वर्षाव॥८॥

काठावरली अनुपम शोभा
भरून ठेवि स्मरणात।
तियेचि ही विचारधारा
वाहे शुद्धपणात॥९॥

गाय असो वा वाघ वनिचा
भेद न मानि मनात।
तहानेल्याची तहान जाणता
तत्पर जल देण्यात॥१०॥

विनम्रतेचि आवड तिजला

नावड परि न कशात।
मिळेल तेचि गोड मानिता
द्वेष नसे चित्तात॥११॥

लगबगीचे कारण पुसता
कुणी तिला मार्गात।
वाहता वाहता सांगे सरिता
''एकचि ध्यास ध्येयात''॥१२॥

थंडी असो वा असो पर्जन्य-उन्ह.ळा
करी सर्वांवरी मात।
चातक पक्ष्यासमान सरिता
अचल सदा ध्येयात॥१३॥

जगामधली सारी विविधता
पाहि आत्मरूपात।
कर्माचे कौशल्य जाणें
शिकवि वेदांताचे पाठ॥१४॥

यत्न हाचि देव तियेचा
आस नसेचि फळात।
परिणामाचि क्षिति न तिजला
तेजस्वि जीवनात॥१५॥

निश्चयाच्या ध्यासाने तिजला
मिळते बळ कार्यात।
कालचक्र हे फिरत असता
मग्न सत्कार्यात॥१६॥

प्रसन्नतेने प्रवास करता
रूतलि न कधी दुःखात।
मंगलतेचि कास धरूनि
मंगल करी जगतात॥१७॥

कर्तव्याचा मार्ग क्रमिता
पडली सागराशी गाठ।
कृतार्थ झाली जीवन-सरिता
सागर सान्निध्यांत॥१८॥

–श्री. शाम जुवळे
दादर (प.), मुंबई.

---

## श्री साईबाबांचा सुलभ व प्रेमळ उपदेश

बालसाईभक्तांनो, श्री साईबाबांनी कधी ग्रंथ लिहिले नाहीत किंवा पांडित्यपूर्ण भाषणे दिली नाहीत. साईबाबांची उपदेश करण्याची रीत प्रेमळ व जगावेगळी उदाहरणे देऊन असे.

आपण बाबांची उपदेशाची रीत व त्यांचे उपदेश याबाबत येथे थोडक्यात पाहू.

आपण सर्वांशी प्रेमाने वागावे. गतजन्माचे काही देणे-घेणे आहे म्हणून आपणाला हा जन्म लाभला आहे; मग आपापसात भांडण करण्यात काय अर्थ आहे!

वाद-विवाद करू नका. आपल्यातील भेदाभेदाची भिंत पाडून टाका; म्हणजे मग ईश्वर व आपण यांतील अंतर फार दूर नाही.

भुकेलेल्याला प्रथम अन्न द्या. तहानलेल्याला पाणी द्या. अन्नदान सर्वात श्रेष्ठ आहे. उपास करू नका. तसे केल्याने देहाला कष्ट होतात.

सर्व प्राणीमात्रांत ईश्वर पहा.

भिकारी अथवा दारी आलेल्याला हाडहाड करू नका. द्यावयाचे नसेल तर शांत रहा.

आपल्या कुलदैवताची उपासना करा. आपणास आवडेल त्या देवताची आराधना करा. कारण शेवटी ''सबका मालिक एक है''.

ईश्वराचे नित्य स्मरण करा. त्याच्यापेक्षा श्रेष्ठ कुणी नाही ''अल्ला से बढ़कर कोई नहीं.'' परमेश्वराची आठवण ठेवली तर अहंकार आपोआप जळेल व तुमची प्रगती होईल.

सर्व धर्मांचा आदर करा. मृत्यू हा अखेर येणारच. तेव्हा मृत्यूचे स्मरण ठेवून नामस्मरण करीत रहा.

नम्रतेने वागा. हटवाद करू नका. ज्ञानी, वृद्ध यांचा सल्ला व आशीर्वाद घ्या.

कुणाचीही निंदा करण्यात आपला अनमोल वेळ दवडू नका.

सर्वांवर रामबाण उपाय म्हणजे **''श्रद्धा व सबुरी''**. यावर विश्वास ठेवून जीवनाची यात्रा सफल करा.

बालसाईभक्तांनो, चला आपण सर्वजण बाबांच्या ह्या अनमोल उपदेशांचे आयुष्यभर आचरण करून आपले जीवन सफल बनवू या!

**–श्री. प्रमोद रायसोनी**
उस्मानपुरा, औरंगाबाद.

## श्री साईबाबांच्या जीवनकथा

# अहमदाबाद येथला अद्‌भुत दृष्टांत!

श्री साईबाबांचा जन्म पाथरी (परभणी जिल्हा) येथे १८३५ मध्ये झाला. १८५१ च्या सुमारास १६व्या वर्षी ते निंबाच्या झाडाखाली प्रथम अवतरले. पुढे चांदभाईच्या वऱ्हाडासमवेत १८५८ मध्ये पुन्हा शिरडीच्या गांवकुसावर प्रगट झाले. तेथपासून १९१८ पर्यंत म्हणजे ८२ वर्षे त्यांचे शिरडी येथे वास्तव्य झाले. सतत पाच तपे त्यांनी शिरडीच्या भूमीत काढली. हे ऐकून साईभक्तांनो, तुम्हाला अचंबा वाटला असेल नाही! कारण बाबांनी आपले पूर्ववृत्त अगदी गूढ ठेवले होते.

बाबांचे माता-पिता कोण? त्यांचा जन्म कुठला? त्यांचे गुरु कोण इत्यादींचा शोध घेणे म्हणजे अजन्म्याचा जन्म शोधणे, अतर्क्य अचिंत्याची जातकुळी, धर्मपंथ विचारण्यासारखे वेडेपणाचेच होय! त्या कल्पवृक्षाची सावली अनुभवणे, फळे खाणे हेच वास्तववादी शहाणपणात गणले जाईल. तरीही जिज्ञासा अमर आहे. यास्तव बाबांची मूळकथा सांगू या.

संसाराच्या वादळातील नौका, अंधारातील तेजाचा दीप असे आमचे लाडके साईबाबा पाथरी गावी जन्मले, याबाबत कुणाचे फारसे दुमत नाही. बाबांच्या निल्यालापात कधीमधी पाथरी, सेलू, मानवत, औरंगाबाद, बीड इत्यादींचा उल्लेख येई. कुणी निजामशाहीतील रहिवाशी आला की पाथरी, परभणीच्या प्रमुख व्यक्तींची बाबा विचारपूस करीत. दासगणूंची श्री साईहरिकथा, नरसिंहस्वामी, स्वामी साईशरणानंद इत्यादींच्या साईचरित्रात पाथरीचा तसा उल्लेख आहे. सत्यसाईबाबा तर साईबाबांची पाथरीतील जन्मतारीख २८-९-१८३५ अशी सांगतात. बाबांचे गुरु शेलूचे व्यंकुशहा म्हणजे गोपाळस्वामी देशमुख यांना श्री साईबाबांच्या रूपात संत कबीराचा अवतार मानवतजवळ होणार असल्याचा दृष्टांत ते तीर्थयात्रेनिमित्त अहमदाबाद येथे गेले असता तेथील सुबागशहा पीराच्या दर्ग्यात झाला. हा काळ अठराव्या शतकाच्या पूर्वार्धाचा असावा. तो संवाद मी कथारूपात येथे खास वाचकांसाठी सादर करतो.

## बाबांचे आविर्भवन

(स्थळ: अहमदाबादचा दर्गा)

(गोपाळस्वामी हे व्यंकटेश (तिरुपती) भक्त होते. ते मोगलाईत एक सुभेदार म्हणजे प्रशासक व अध्यात्मात एक महान संत होते. पश्चिम भारतातील तीर्थे पहात ते अहमदाबाद येथील पीर सुबागशहा यांच्या दर्ग्यात आले. त्यांनी त्या सत्पुरुषाला सादर वंदन केले.)

गोपाळस्वामी: हे बंधो, मी तुझ्या या पावनस्थानी येऊन आज धन्य झालो. हे प्रिय मित्रा, मला व माझ्या या शिष्यांना तू दुवा दे, आमच्या आध्यात्मिक मनोगतांना सफल कर.

एक शिष्य: महाराज, तो पहा अद्‌भुत चमत्कार! या दर्ग्याच्या भिंतींना आणि पीराच्या समाधीवर हे अचानक धर्मबिंदू प्रगट झाले आहेत.

गोपाळस्वामी: खरेच पीर सुबागशहा आपल्या आगमनाने रोमांचित झाले आहेत. हे प्रेमाश्रू आहेत. या समाधीभोवती हिरवा गलेफा पसरला आहे. आतून काही तरी आवाज फुटत आहे.

एक शिष्य: स्वामीजी, सुबागशहा आपल्याला कोणते रहस्य सांगू इच्छित आहेत? आपल्यालाच ती दैवी वाणी समजू शकेल.

गोपाळस्वामी: (सिद्धासनात बसतात. एकाग्रतेने ध्यानमग्न होतात.) हे अल्ला रहम कर. तुझा काय संदेश तो सांग. (आवाज फुटतो.) ....सावधान, पीरसाहेब काही सांगत आहेत..

आवाज: हे दयाघन गोपाळस्वामी, तुमचे स्वागत असो. तुम्ही काशीचे पूर्वजन्मातील श्री रामानंद महाराज हे मी जाणले आहे. पूर्वी दिलेल्या वचनांना पाळण्यासाठी आपण माझ्या या गरीबाच्या कुटीत पाय ठेवलात. मी धन्य झालो.

गोपाळस्वामी: पीरसाहेब, मी केवळ अल्लाच्याच आदेशाने माझ्या शिष्यांसह या ठिकाणी आलो आहे. मीच आपल्या दर्शनाने धन्य झालो आहे. आपल्या या प्रत्यक्ष स्वागताने माझी भारताची तीर्थयात्रा आज सफल झाली आहे.

आवाज: महाराज, ही तीर्थयात्रा आता पुरे झाली. तीर्थेच आपल्या स्पर्शाने पावन होत आहेत. तीर्थदर्शनाने आपण अधिक पावन होणार नाही. कारण आपण मुळातच पाक आहात. आपण ही यात्रा संपवून आपले दैवदत्त कार्य पार पाडावे.

गोपाळस्वामी: असे कोणते कार्य माझी वाट पहाते आहे?

आवाज: रामानंदजी, आपला शिष्य परवरदिगार मालिक कबीरसाहब विश्वाच्या कल्याणासाठी पुन्हा जन्म घेणार आहे. आजच्या काळात जातीधर्मांच्या झगड्यात त्याची अमर रहनी आणि करणी जगाला हवी आहे. त्याची वाणी आपण ऐकली आहे. आता करणी व रहनी जगापुढे येणार आहे. मानवतजवळ हा नवा अवतार होत आहे. आपण शेलूला परत जा. त्याला

मार्ग दाखवा.

गोपाळस्वामी : कबीराला मी कोणते मार्गदर्शन करू! तो अल्लाचाच परमथोर अंश आहे. तो आपले काम कुणाच्या मदतीवाचून सहज करील. काळ आणि नियती त्याची इच्छा व कार्य अडवू शकणार नाही.

आवाज : हे प्रभो! त्याचे स्वागत करा. तुमच्या आश्रमात तो शिकावयास स्वत: म्हणून येईल. त्याला तयार करा. त्याचे दैवीकार्य तो सुरु करण्यापूर्वी त्याच्यावरील मायेची काजळी दूर करण्यासाठी गुरुची जरूरत आहे. राम आणि कृष्ण यांनाही गुरु होते, हे आपले हिंदुशास्त्र सांगते नाही का! आपला हा जन्म या कामासाठी नियतीने योजिला आहे.

गोपाळस्वामी : अल्लाची इच्छा! जशी प्रभूची इच्छा असेल तसे घडू द्या. मी एक नाममात्र सेवक आहे. अल्लाचा आदेश मला शिरोधार्य आहे. (सिद्धासन व ध्यानमुद्रा सोडून उठतात.) सुबागशहा, पुन्हा पुन्हा अभिवंदना!

(गोपाळस्वामी तुर्बतीला नमस्कार करतात. शिष्य फुले वहातात. दर्ग्यामधून धूपाचा दिव्य परिमळ दरवळत रहातो. सर्वत्र एक दिव्य प्रकाश पसरलेला दिसतो. गोपाळस्वामी शिष्यांसह तीर्थयात्रा आवरून शेलूला परत फिरण्याच्या इराद्याने परततात.)

## प्रगटले निंबातळी श्रीहरी



संत कबीरांचा जन्म साधारणपणे १४३५ ते ४०च्या दरम्यानचा असावा. बाबा सुमारे ४०० वर्षांनंतर १८३५च्या सुमारास जन्माला आले. बाबा व कबीर ह्या दोन्ही महापुरुषांची मूळकथा, तत्त्वज्ञान व कार्य हे समांतर भासते. बाबा शिरडीत मशिदीत बसून भोवतालच्या भक्तांना पुष्कळदा आपल्या भ्रमंतीच्या गूढकथा सांगत. त्या प्रतिकात्मक असत. पण पुष्कळदा जहांगीराच्या जीवनातील कसोटीचा काळ, अकबराचा उमरकोट येथील जन्म, अकबराच्या उत्तर आयुष्यातील स्वैरतेच्या वागणुकीचे उदाहरण, त्यावेळी बाबांच्या त्याकाळच्या आविष्करणाने केलेले मार्गदर्शन अशा विषयांवर या भ्रमंतीचा रोख असे. हा काळ १५०० ते १६००च्या दरम्यानचा असावा. तसेच त्यापूर्वी १००० वर्षे म्हणजे गुप्तांच्या वैभवकाळाचा वा हूणांच्या आक्रमणाच्या काळाचाही उल्लेख त्यात असे. याचा अर्थ हे गुरुचैतन्य शतकाशतकातून आपल्या सर्वसाक्षित्वाचा साक्षात्कार घडवीत अखंड वावरत होते, असा होतो. या अविनाशी गुरुशक्तीला आदि वा अंत नव्हताच.

बाबांचा पाथरी येथे जन्म झाल्यानंतर लवकरच शेलू येथील संत व प्रशासक श्री व्यंकुशा यांच्या गुरुकुलात बाबा योगायोगाने दाखल झाले. सुमारे १८३९ ते १८५१ पर्यंतचा १२ वर्षांच्या तपश्चर्येचा हा काळ त्या अलौकिक बालवयाला स्पर्शून गेला. त्यानंतर सुमारे १८५१ ते ५३ या कालावधीत केव्हातरी बाबा हे एका सोळा वर्षाच्या युवकाच्या रूपात शिरडीतील त्या निंबवृक्षाच्या तळी गावकऱ्यांना दिसले. त्यांच्या मुखावरील तपाचे अद्भुत तेज, त्यांचे बालवयातील वैराग्य यांनी ती भोळी जानपद गावकरी माणसे अक्षरश: दिपून गेली. त्यांचा जन्म, मातापिता, कुलवृत्तांत, जातपंथ कुणाला ठाऊक नसल्याने लोकांत बाबांबद्दल फार कौतुक, औत्सुक्य व उत्कंठा या भावना वसत. खेडूत मंडळी जमली की त्यांची चर्चा चाले.

(स्थळ – निंबवृक्षाच्या तळी काळ – सुमारे १८५१ ते ५३चा)

एक गावकरी : त्या निंबाच्या खाली बसलेल्या त्या कोवळ्या तरुणाकडे पाहिलेत? तो कोण आहे कुणास ठाऊक!

एक वृद्धा : तो त्या झाडाखाली ध्यानात असल्यासारखा बसलेला असतो. काही मागत नाही. स्वत:बद्दल काही बोलतही नाही.

गावचे पाटील : मी त्याच्याबद्दल चौकशी करीत असतो. तो जंगलातील पानसावरी आणि निवडुंगात मातीच्या खड्ड्यात झोपत असतो. तो काय खातो, कुठे जातो, ते काही समजत नाही. त्याच्या चेहऱ्यावर मात्र साधनेचे तेज आहे. तो कोणी महात्मा असावा, असा माझा कयास आहे.

एक गावकरी : पण एक मात्र मोठे गूढ वाटते. या निंबाखाली दिवसातून बऱ्याच वेळा तो बसलेला असतो. जवळच झेंडू, गुलाबाची रोपे त्याने लावली आहेत. कच्च्या घड्यातून तो बावडीतले पाणी झाडांना घालीत असतो. यामागे काही तरी गुपित असले पाहिजे.

पाटील : मला लोकांनी सांगितले की त्याच्या गुरुची समाधी या झाडाखाली आहे, असे कधीमधी तो म्हणत असतो.

पण येथे त्याचे गुरु असल्याचे कुणाच्या ऐकिवात मुळीच नाही. काही मंडळी या मुलाला पंढरपूर आणि मंगळवेढ्याला पाहिल्याचे सांगतात. मंगळवेढ्याला निंबाजवळ तेथील श्रीदत्तअवतारी स्वामीमहाराज बसत असत. त्या स्वामीशी या मुलाचा काही संबंध आहे काय याची कल्पना नाही.

एक गावकरी: मला वाटते की उत्तरेतील कबीरपंथी साधूसारखा हा भटका साधू असावा. कित्येकदा कबीराची पदे म्हणताना याला गावातील मंडळींनी ऐकले आहे.

नाना चोपदाराची आई: तुम्हाला गेल्या सोमवारची गोष्ट कळली का? अरे, खंडोबाच्या भगतावर वारे आले होते. लोकांनी त्या संचाराला या मुलाबद्दल विचारले, तेव्हा तो धावत निंबापर्यंत आला व कुदळीने त्याने जमीन खणली. या ठिकाणी लोकांना एक भुयार व त्यात पेटलेल्या पणत्यांची जागा दिसली. त्या ठिकाणी या मुलाने तपश्चर्या केली, असे संचाराने सांगितले.

एक गावकरी: याच्यावर भरवसा ठेवणे कठीण वाटते. हा मुलगा येथे इतकी वर्षे तपश्चर्या करणे शक्य वाटत नाही.

नाना चोपदाराची आई: देवाचे घटित कुणाला समजणार! या ठिकाणी याच्या गुरुची समाधी होती म्हणतात. संचाराने सांगितले की या गुरुची मुलाने बारा वर्षे सेवा केली.

पाटील: यावर विश्वास बसत नाही. साधुपुरुष एकमेकांना गुरु वा बंधु मानीत असतात. पण ते काही प्रत्यक्षात खरे धरून चालायचे नसते. महान् साधु हे गुरुच असतात. साधूंची सेवा ही गुरुसेवाच होय! दत्तगुरुचे सारे महात्मे अंश असतात. संतसेवा म्हणजे गुरुसेवा हे तत्त्व ध्यानात ठेवा. म्हणजे ज्याची समाधी येथे असेल, तो महात्मा सर्वांचा गुरुच आहे, हे लक्षात येईल. (सर्व जातात.)

शिरडीमधील ही घटना सत्य असेलही पण तिची ग्वाही देता येत नाही. श्री साईबाबा थोर वयोवृद्ध संतांना 'गुरु' मानत व समकालीन सत्पुरुषांना 'बंधु' समजत. ताजुद्दिनबाबा, गजानन महाराज, टेंबेस्वामी यांचे उदाहरण श्री साईसत्चरितात सापडतेच. १९१२ मध्ये भक्तांनी स्वामी समर्थांच्या पादुका निंबातळी स्थापिल्या. बाबांनी स्वामी समर्थ भक्तांना **'स्वामी शिरडीत आहेत'** असे सांगितले. पादुकांना **'हे देवाचे पाय'** ह्या शब्दांत गौरविले, हे साईभक्त वाचकांना सांगावयास नको. स्वामी साईशरणानंदांनी असे भुयार द्वारकामाईपर्यंत पसरले होते व तेथे बाबांनी एक तप सेवा केली असे उल्लेखिले आहे. परंतु याला काही ठोस पुरावा नाही. सत्यसाईबाबा यांनी बाबांना कबीरावतार व युगायुगात संचरणारी ऐतिहासिक शक्ती असे स्पष्ट शब्दांत म्हटलेले नाही. त्यांनी बाबांना शिवाचा प्रत्यक्ष आविष्कार संबोधिले आहे व महाराष्ट्रप्रमाणे आंध्र, कर्नाटकातही अवतार होईल आणि असे तीन शिवावतार असतील असे सांगितले आहे. ह्या सर्वांनी दिलेले तपशील पूर्णत: जुळणारे नसल्याने आधारभूत मानणे कठीण आहे. बाबा हे त्या सद्गुरु दत्ताचे अंशावतार, एक अविनाशी उद्धारक व मानवतावादी करुणामय गुरुशक्ती, ही श्रद्धाच योग्य ठरेल.

–चकोर आजगांवकर

**लोकांपासूनि दक्षिणामिषें। घेत असत बाबा जे पैसे। कांहीं धर्मार्थ वांटीत जैसे। कांहीं तैसेचि ते देत॥३८॥ कोणासी रोज रुपये तीस। कोणासी दहा, पंधरा, पन्नास,। ऐसें मन मानेल तयांस। वांटीत उल्हासवृत्तीनें॥३९॥ हा तों सर्व धर्माचा पैसा। घेणारासही पूर्ण भरंवसा। विनियोगही व्हावा तैसा। हीच मनीषा बाबांची॥४०॥ असो कित्येक दर्शनें पुष्ट। कित्येक झाले दुष्टांचे सुष्ट। कित्येकांचे गेले कुष्ट। पावले अभीष्ट कितीएक॥४१॥ न घालितां अंजन पाला रस। कितीक अंध झाले डोळस। आले पाय कितीक पंगूंस। केवळ पायांस लागतां॥४२॥ महिमा तयांचा अनिवार। कोणा न लागे तयांचा पार। यात्रा येऊं लागली अपार। अपरंपार चौंबाजूं॥४३॥**

–अध्याय ७, श्री साईसत्चरित

## संस्थानचे माजी अध्यक्ष बाळासाहेब सावंत यांचे दु:खद निधन

श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाचे माजी अध्यक्ष श्री. पी. के. तथा बाळासाहेब सावंत हे दिनांक ११ मे १९९१ रोजी वयाच्या ८३व्या वर्षी श्री साईचरणी विलीन झाले. श्री साईबाबांवर त्यांची नितांत श्रद्धा होती. बाबांच्या श्रद्धा व सबुरी या संदेशाचे त्यांनी आजीवन आचरण केले. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात त्यांनी अनेक जबाबदारीची पदे समर्थपणे भूषविली. अधिकार व कीर्ति ह्या दोन्ही गोष्टी त्यांना लाभल्या तरी गर्व त्यांना कधीच स्पर्श करू शकला नाही. त्यांना दीन-दुबळ्यांबद्दल असलेली आस्था व त्यांचा मनमिळावू स्वभाव यामुळे त्यांचा लोकसंग्रह वेगवेगळ्या थरातील होता. संस्थानच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळीत असताना त्यांनी शिरडीला येणाऱ्या भाविकांसाठी अनेक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला.

ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो, ही श्री साईचरणी प्रार्थना.

–संपादकीय विभाग

# स्मरा नित्य साई सद्गुरुचे नाम

–श्री. वि. म. हटवार
रेशीमबाग, नवापूर.

प्रत्येक जीव शिवाचा अंश आहे. जीवाने शिवाकडे आकृष्ट होणे, शिवमय होणे व शिवात विसर्जित होणे, हे संस्कारमय जीवनाचे उद्दिष्ट आहे. म्हणूनच साईनाथांवर श्रद्धा ठेवून देह-प्रारब्धाचे भोग भोगावे.

श्रेष्ठ संत श्री साईबाबा सर्वांना सांगत **'सब पर दया करो. सब के दु:खों का निवारण करके अपने सुख का अनुभव करो. ममता और अहंकार से सदा बचे रहो. मालिक सबका भला करेगा. उसको श्रद्धा से देखो. वही सब का मालिक है. सुख-दु:ख समान भाव से अनुभव करो.'**

श्रीसद्गुरुवर निष्ठायुक्त श्रद्धा असेल तरच कार्यसिद्धी होईल. विश्वास व विवेकबुद्धी असल्याशिवाय कोणताही व्यवहार लाभदायक होत नाही. वैद्यावर विश्वास नसेल तर कितीही किंमती औषधाने रोग बरा होणार नाही.

सर्वश्रेष्ठ ईश्वर सर्वशक्तिमान व सर्वज्ञ आहे. ईश्वराच्या नामस्मरणाने भय नष्ट होऊन आत्मविश्वास वाढतो. ईश्वर अनंतकोटी ब्रह्माण्डाचा रक्षक, सर्वेश्वर, शरण आलेल्या जीवात्म्याचा रक्षणकर्ता आहे.

साईस्वरूपाचे नित्य ध्यान केल्याने भक्ताचे मनोरथ पूर्ण होतात. साईरामाच्या भजनात परमानन्द मिळतो. सांसारिक वस्तु व व्यक्तीस समर्पित न होता साईला शरण जावे.

मनुष्यजीवनाच्या प्रगतीचे तीन टप्पे आहेत– सहजप्रवृत्ती, भौतिक समृद्धी आणि मानसिक उन्नती. हा परीघ ज्या महाभागांनी ओलांडला, ते बुद्ध, महावीर, साईनाथ यांनी चालू जन्माबद्दल तर सांगितलेच; परंतु पुढच्या जन्माचेही ते सांगत. आसक्ती, राग, द्वेष त्यागणारे ब्रह्मानंदी तल्लीन होतात. सत्याची शोभा आत्मज्ञानाने किंवा साक्षात्काराने झाली तरी ते सत्य पचविता आले पाहिजे. अध्यात्म हे अंतिम सत्याकडे नेणारे शास्त्र आहे. पूर्णातून पूर्णाचा उदय होऊनही पूर्ण शिल्लकच राहते.

सर्वसामान्य लोक केवळ याच जन्माबद्दल बोलतात; कारण ते वर्तमान आयुष्यातील शारीरिक, मानसिक व बौद्धिक सुखाचा मर्यादित विचार करू शकतात. ऐहिक संपन्नतेकरिता ते धडपड करीत असतात. स्वसुखाकरिता जे कुणावर अवलंबून रहात नाहीत, ते समाधानी असतात. अति-परिश्रम करूनही यशप्राप्ति न झालेले, ज्यांना संसाराच्या कटकटींना कंटाळून वैराग्य आलेले असते, अशा परिस्थितीतही मनावर ताबा ठेवून जे साईभजनाकडे वळतात, ते भक्त होतात.

बालपणापासून जे आध्यात्मिक संस्कार मनावर उमटलेले असतात, ते सन्मार्गाकडे जाण्यास सतत प्रवृत्त करून साईसेवेत गुंतवितात. तेच संस्कार पुढे भक्तिपंथास लावून ज्ञानप्रवीण करतात. संसारातील ममता कमी झाली तरच अंत:समयी कशाचीही आस उरत नाही. मन साईध्यानात रमलेले असते.

**'ध्यान साईचे करता करता, आनंद भरून राहे चित्ती।
मना वाटे अतिप्रसन्न, दु:खें सारी दूर जाती॥'**

प्रपंचातूनच परमार्थाकडे जाण्याची श्री साईंची शिकवण आहे. माणूस म्हणून जगण्याचे सौंदर्य कळावे याकरिता संस्कृती आहे. ती विकसित होण्यासाठी अध्यात्मज्ञानाची समाजाला आवश्यकता आहे. श्री क्षेत्र शिरडीत श्री साईरामाने साजरी केलेली रामनवमी ही आत्मिक विजयाची विजयादशमीच होती. यामुळे ह्या दोन्ही उत्सवांना सारखेच महत्त्व प्राप्त झालेले आहे. ज्यांना आत्मज्ञानाची साक्ष पटली त्यांना मनुष्यजन्म यशस्वी झाल्याचे साक्षात्कारी जीवन अनुभवून विजयी मुद्रेने प्राणत्याग करता येतो व त्यामुळेच समाज अशा थोर विभुतींची पुण्यतिथी उत्साहाने साजरी करतो. त्यांच्या जन्मोत्सवास व पुण्यतिथी सोहळ्यास भक्तजनांस आत्मानंदाची सारखी प्रचिती येते. अशा भारावलेल्या निष्ठावान सेवकांचा उद्धार साईनाथ करतात. आध्यात्मिक उद्धारासाठी इच्छाशक्ती व क्रियाशक्ती एक झाली पाहिजे. साईउपदेश भोळ्या जनांचा आवडता विषय होता. श्री बाबा बोलतील, काहीतरी सांगतील म्हणून चावडीवर गावकरी एकत्र होत. परगावाहून आलेले भक्त बाबांची परवानगी मिळाल्याशिवाय शिरडी सोडत नसत. समर्थ जे बोलतात, तेच घडत असते. लोकांना जागृत करण्यासाठी देवदूताचे कार्य साईंनी केले व सर्वांना समतेचा संदेश दिला. श्री साईबाबांचे बोल हाच उपदेश मानून अनेकांनी स्वत:च्या प्रापंचिक यातना दूर केल्या. काहींनी देहत्यागाआधी संन्यास घेऊन साईंच्या सान्निध्यात राहून आत्मोद्धार करवून घेतला व साईचरणी अनंतात विलीन झाले. असे भाग्य फारच थोड्या भक्तांना लाभले तरी अनेकांना त्यामुळे सद्बुद्धी लाभली व श्री साईदर्शनाची ओढ लागली. श्री साईसत्चरित पोथीच्या २५व्या अध्यायात सांगितलेली अभिवचनें श्री साईराम आजही पूर्ण करीत आहेत.

---

# आपुले ते आपुलियासंगे।
# दुजियाचे ते दुजियासंगे॥

-श्री. चंद्रशेखर नकाते
सोमवार पेठ, कराड.

आजचे जग हे स्पर्धात्मक आहे. प्रत्येक गोष्टीमध्ये स्पर्धा, चुरस ही क्षणोक्षणी दिसून येते. वास्तविक स्पर्धा ही मानवाच्या यशोमंदिराचा पाया आहे. जेथे स्पर्धा असते तेथेच उन्नती होते. ज्या स्पर्धेत आपणास हार मानावी लागते, ती हार आपण आनंदाने, निग्रही मनाने पचवायला शिकले पाहिजे. अन्यथा हेच पराजयाचे बीज माणसाच्या अंगी पेरले जाऊन क्रोध व मत्सराचे झाड त्या माणसाचा नाश होईपर्यंत फोफावत रहाते. चुकीचा पश्चाताप आपल्याला लवकर व्हावा लागतो. नाहीतर विनाशाला आमंत्रण देणेच होय!

वरील गोष्टीवरून बाबांनी आपल्याला सांगितलेले तत्त्व **'आपुले ते आपुलिया संगे; दुजियाचे ते दुजिया संगे'**, हे किती महान साक्षात्कारी तत्त्व आहे, याची येथे प्रचिती येते.

व्यवहारी जीवनात मानव बारीक-सारीक गोष्टींतही आपली तुलना दुसऱ्याबरोबर करण्याचा प्रयत्न करीत असतो. आपल्याला दुसऱ्याची प्रगती झालेली पहावत नाही, हे कटुसत्य आहे. याबाबतीत बाबांनी सोप्या शब्दात केलेला उपदेश अगदी मार्मिक आहे. ते सांगतात की उगाच कुणाशी बरोबरी करू नका. आपली पात्रता ओळखून आपल्या महत्वाकांक्षा जोपासा.

कावळ्याने राजहंसाचे सोंग घेतले तरी कावळ्याचा आवाज लपत नाही.

आपल्या आयुष्यात घडणारी प्रत्येक गोष्ट ही परमेश्वराची कृपा समजा. माणूस आपल्या चिंतेमुळे जेवढा थकत नाही तेवढा मत्सरामुळे थकतो, हे लक्षात घ्या.

बाबांच्या वरील तत्त्वज्ञानात मानवाला मत्सर, क्रोधापासून दूर रहायला सांगितलेले आहे.

एखाद्या कठीण प्रसंगी माणूस हतबल होतो. अशा वेळी त्या प्रसंगाला सामोरे जाण्यासाठी आपल्यात शक्ती निर्माण व्हावी, अशी आपण बाबांकडे प्रार्थना करू या. बाबांनी म्हटलेलेच आहे की **'जर तुम्ही माझ्याकडे पहाल तर मी तुमच्याकडे पाहीन.'**

बाबांची ही शिकवण आपल्या दैनंदीन व्यवहारात नित्य उपयोगी व बहुमुल्य आहे.

प्रत्येक मानव हा आपल्या आयुष्यातील घडामोडी अगोदरच आपल्या विधात्याकडून लिहून घेऊन येत असतो तर एकमेकांशी हेवेदावे करण्यात काय अर्थ आहे! दुसऱ्यांची उपेक्षा करणे हे केव्हाही गैरच. प्रत्येकाच्या आयुष्याचे रस्ते जरी वेगवेगळे असले तरी अंतिम स्थान मृत्यू हेच आहे. म्हणून मृत्यूचे भान ठेवून, बाबांची उदी भाळी लावून कुणाचेही वाईट न चिंतिता, कुणाचाही मत्सर न करता आपण आपले आयुष्य व्यतीत करु या, बाबांच्या चरणी आपले जीवन अर्पू या.

---

## श्री साईबाबा संस्थान शिरडी
### फोटोंची यादी

| अनु. क्र. | फोटोचे नांव | साईज | किंमत |
|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४" X २०" | २.२५ |
| २. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | ४" X ५" | ०.२५ |
| ३. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | २" X ३" | ०.१० |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १४" X २०" | २.२५ |
| ५. | द्वारकामाई (४ रंगात) | १०" X १४" | १.२० |
| ६. | द्वारकामाई (४ रंगात) | ७" X १०" | ०.६० |
| ७. | मूर्ती (४ रंगात) | १४" X २०" | २.२० |
| ८. | मूर्ती (४ रंगात) | १०" X १४" | १.१० |
| ९. | मूर्ती (४ रंगात) | ७" X १०" | ०.६० |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४" X २०" | २.४० |
| ११. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १०" X १४" | १.३० |
| १२. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | ७" X १०" | ०.६० |
| १३. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०.२५ |
| १४. | पालखी (४ रंगात) | ७" X १०" | ०.६५ |
| १५. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४" X २०" | २.१० |
| १६. | ३-डी (शिरडी-दर्शन) | — | ४०.०० |

सर्व फोटोंकरिता पॅकिंग व पोस्टेजचा दर रु. ७.०० आहे.

---

**पुस्तके आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :-**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी
पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३ १०९.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३३.१५ | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | — | — |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | १८.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २४.०० | ११.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | १७.७५ | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २०.७० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २६.५० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ८.२५ | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ११.५० | १०.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ७.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ७.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ७.०० |
| १७. | स्तवनमंजरी | इंग्रजी | — | — |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.०० | ७.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ७.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | ०.९५ | ७.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ३.६० | ७.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | १.२५ | ७.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | २.५० | ७.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ६.८० | ७.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | १.६० | ७.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ७.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | १.६० | ७.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ७.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | २.३० | ७.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ७.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | | ६.७० | ७.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ४.५० | ७.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ७.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५.२५ | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ९-५० | १०-०० |


Registered with the Re
of News-papers for
No. MH




मुद्रक: श्री. एम. डी. राजन, गीता ऑफसेट, बी-२३, रॉयल इंडस्ट्रियल इस्टे, नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई-४०० ०३१.
संपादक व प्रकाशक: कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी, साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर,
मुंबई-४०० ०१४.

जुलै - ऑगष्ट १९९१

# श्री साईलीला





भारताचे माननीय उपराष्ट्रपती डॉ. शंकरदयाळ शर्मा व त्यांची पत्नी सौ. विमला शर्मा यांनी मंगळवार, दिनांक ९ जुलै, १९९१ रोजी श्री साईबाबांच्या समाधीमंदिरात

श्री

# साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

श्री साईबाबांच्या
दिव्य संदेशाचा प्रसार

वर्ष ७० वे) जुलै – ऑगस्ट १९९१ (अंक ४-५

भारतीय ज्येष्ठ – आषाढ – श्रावण, शक १९१३

संपादक
कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

मानद सहाय्यक कार्यकारी संपादक
सौ. प्रविणा कांबळी, विजय क्षीरसागर, सुरेंद्र देसाई

–: कार्यालय :–

पोस्ट – शिरडी – ४२३१०९, जिल्हा – अहमदनगर.
साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई-४०० ०१४. दूरध्वनी – ४१२ २५ ६१

वार्षिक वर्गणी – रु. २५/-, आजीव सभासद वर्गणी – रु. ५००/-,
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी – रु. ५००/- (टपाल खर्चासहित), किरकोळ अंक – रु. ५/-



या मासिकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.



## रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

१४४

होणार गोष्टींचा करी जो विचार। तयापाठीं हार लागे सदा॥
जन्म जेणें दिला तोचि वाहे चिंता। जगाचा निर्मिता पांडुरंग॥
कल्पनेच्या लेखा न पुरे भुवन। कितीएक जन्म घेशी तरी॥
दास म्हणे ठेवीं बोला या विश्वास। विकल्पाचा भास चुकेल तो॥

१४५

ऐपतीसारिखा येई रोजमुरा। वाटा सहाबारा वेंचावया॥
द्रव्यव्यय केला नाहीं यश वांटा। आणिक त्या लाटा उसळती॥
बरा काळ नये ऐशा या लक्षणें। किती लाजिरवाणें अवघ्यांना॥
कांहींतरी करा स्वहित-विचार। जगीं शिरजोर राहूं नका॥

१४६

सांई तुजवीण नसे सौख्य रे मला॥
काय करुं पराधीन जन्म लाधला॥सांई०॥ध्रु०॥
सर्व काळ सांइ सांइ। वाटतसे मनीं पाहिं॥
स्मरण करित धाइ धाइ। शोधितें तुला॥
सर्वव्यापि अससि खरा। भक्त-काज-अवतारा॥
सांइनाथ गुरुवरा। पाव दासिला॥

१४७

संतसमागम अथवा वचन। यासी अवधान नित्य ठेवा॥
दाविलेला मार्ग संतांनीं समग्र। तयाचा अव्हेर करुं नका॥
दुर्जनसंगतीं दारुण विपत्ति। कैसी मिळे मुक्ति तयांलागीं॥
येउनी जन्माला जो नर चुकला। फुकटचि मेला सत्य जाणा॥

१४८

पेरियलें जैसें तैसें उगवलें। अनुभवा आलें ज्याचें त्यासी॥
याउपरी काय आणिक दाखला। प्रपंची शिणला दिसेंदिस॥
कैसें तुजला रे वाटतसे सुख। सुख नव्हे दुःख नरकवास॥
पुर्नजन्म आहें निश्चित तुजला। स्मरतां गुरुला चुके भोग॥

## 'श्री साईलीला' सभासदांना निवेदन

**'श्री साईलीला'ची वार्षिक वर्गणी रु. २५ झाली असून आजीव सभासद वर्गणी रु. ५०० करण्यात आली आहे. तरी जुन्या सभासदांनी व नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्यांनी कृपया याची नोंद घ्यावी.**

'श्री साईलीला'च्या आजीव सभासदांना मराठी किंवा इंग्रजी-हिंदी अंकांपैकी एकच अंक पाठविण्यात येईल. तरी आजीव सभासदांनी त्यांना वरीलपैकी कोणता अंक हवा आहे, ते अवश्य कळवावे.

'श्री साईलीला'संबंधी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करताना 'श्री साईलीला'च्या जुन्या सभासदांनी त्यांच्या 'श्री साईलीला' सभासद क्रमांकाचा पत्रात उल्लेख करावा.

'श्री साईलीला'च्या वेष्टनावर वर्गणी केव्हा संपत असल्याचा महिना व वर्ष नमूद केलेले असते, त्याप्रमाणे वर्गणी संपण्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर आपली वर्गणी भरावी.

पत्त्यात बदल झाल्यास मुंबई कार्यालयाला त्वरित कळवावे. पिनकोडसहित पूर्ण पत्ता लिहावा.

आपल्या पत्त्यात काही दुरुस्ती सुचवायची असल्यास, पत्ता अपूर्ण लिहिला जात असल्यास त्याविषयी त्वरित मुंबई कार्यालयाच्या निदर्शनास आणावे.

'श्री साईलीला'चे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान, शिरडी, मुंबई कार्यालय, साईनिकेतन, ८०४-बी, खोदादाद सर्कलजवळ, दादर, मुंबई–४०० ०१४. येथे प्रत्यक्ष/मनिऑर्डरद्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास तो "श्री साईबाबा संस्थान, शिरडी" या नावावर असावा. मनिऑर्डर कोणत्या कारणासाठी करीत आहात, त्याचा उल्लेख मनिऑर्डरवर करणे आवश्यक आहे. मनिऑर्डर, पत्र मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेतच लिहावी. "संदेश के लिए स्थान" आणि "भेजनेवाले का नाम व पूरा पता" असे नमूद केलेले असते, त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

मनिऑर्डर किंवा पत्रावर पत्ता लिहिताना वाचता येईल अशा स्पष्ट अक्षरांत लिहावा.

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | श्री पुण्यतिथी उत्सव (दसरा) निमंत्रण | ४ |
| २. | "बाबांची शिकवण आचरणात आणणे हीच खरी साईसेवा!" | ५ |
| ३. | "....मी कानात फुंकणारा गुरु नव्हे...." | ६ |
| ४. | सबका मालिक एक | ७ |
| ५. | गुरुविन अनुभव कैसा मिळे | १० |
| ६. | सद्गुरु साई–अमूर्त गुरुसंकल्पना | १४ |
| ७. | गुरुकृपा | १५ |
| ८. | स्मरा नित्य साई सद्गुरुचे नाम | १६ |
| ९. | शिरडीत श्री गुरुपौर्णिमा उत्सव संपन्न | १७ |
| १०. | तू बा साईनाथा | १९ |
| ११. | साई सर्वांचा आधार | १९ |
| १२. | माझ्या जीवनातील परमोच्च आनंदाचा क्षण, अर्थात्–अमृतवर्षा | २० |
| १३. | साईभक्तांचे अनुभव | ३४ |
| १४. | 'भावेंवीण भक्ति, भक्तिवीण मुक्ति!' | ३७ |
| १५. | शिरडी येथे होमिओपथी व कर्करोग शिबिर संपन्न | ४० |
| १६. | जय जय साईनाथ हरे! | ४१ |
| १७. | साईभक्त म्हाळसापती | ४२ |
| १८. | श्री साई-दरबारातील धुनीचा संदेश | ४५ |
| १९. | अखंड नामस्मरण | ४८ |
| २०. | श्री साईबाबांच्या जीवनकथा | ५० |
| २१. | देह आमुचा पंढरी। श्वास झाले वारकरी॥ | ५२ |
| २२. | प्रसिद्ध किर्तनकार आणि प्रवचनकार वै. प. पू. श. वा. दांडेकर यांचे मननीय बोल | ५३ |
| २३. | श्री क्षेत्र तुंगारेश्वर महादेव | ५४ |
| २४. | श्री साईंचे सत्य चरित्र –अध्याय १५ व १६ | ५६ |

# निमंत्रण

## श्री पुण्यतिथी उत्सव (दसरा)

प्रिय साईभक्तांनो,

श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी दिनांक १७ ऑक्टोबर, १९९१ ते २० ऑक्टोबर, १९९१ या कालावधीत **'श्री पुण्यतिथी उत्सव'** शिरडी येथे साजरा केला जाणार आहे. तरी आपण यात सहभागी होऊन ह्या सोहळ्याची शोभा वाढवावी.

श्री साईबाबांच्या शुभाशीर्वादासह

आपली स्नेहांकित,

प्रो. डॉ. लेखा पाठक
अध्यक्षा

श्री साईबाबा संस्थान, शिरडीतर्फे व करिता

---

## श्री पुण्यतिथी उत्सव कार्यक्रम

प्रारंभ दिन, गुरुवार, दिनांक १७-१०-१९९१

| वेळ | कार्यक्रम |
|---|---|
| सकाळी ५-१५ | श्रींची काकड आरती |
| सकाळी ५-४५ | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक |
| सकाळी ६-१५ | द्वारकामाईत श्री साईसत्चरिताचे अखंड पारायण श्रींचे मंगलस्नान व दर्शन |
| सकाळी ८-०० | श्रींना अर्पण केलेली पवित्र वस्त्रे वगैरेंची जाहीर लिलावाने प्रसादरुपाने विक्री |
| दुपारी १२-३० | माध्यान्ह आरती व तीर्थप्रसाद |
| दुपारी ३-०० ते ५-०० | कीर्तन |
| सायंकाळी ५-०० | सीमोल्लंघन व मिरवणूक कार्यक्रम |
| सायंकाळी ६-०० | धूपारती |
| सायंकाळी ७-३० ते ९-०० व रात्री ९-३० ते ११-०० | निमंत्रित कलाकारांचा गायनाचा कार्यक्रम |
| रात्री ९-१५ | श्रींच्या पालखीची गावातून मिरवणूक |
| रात्री ११-०० | शेजारती (पालखीची मिरवणूक परत आल्यानंतर) |

श्री पुण्यतिथी दिन, शुक्रवार, दिनांक १८-१०-१९९१

| | |
|---|---|
| सकाळी ५-१५ | श्रींची काकड आरती |
| सकाळी ५-४५ | अखंड पारायण समाप्ती |
| सकाळी ६-१५ | श्रींचे मंगलस्नान व दर्शन |
| सकाळी ८-०० | श्रींना अर्पण केलेली पवित्र वस्त्रे वगैरेंची जाहीर लिलावाने प्रसादरुपाने विक्री |
| सकाळी ९-०० | भिक्षाझोळी कार्यक्रम |
| सकाळी १०-३० ते दुपारी १२-३० | पुण्यतिथी कीर्तन |
| दुपारी १२-०० | आराधना विधी |
| दुपारी १२-३० | माध्यान्ह आरती व तीर्थप्रसाद |
| सायंकाळी ६-०० | धूपारती |
| रात्री ९-१५ | श्रींच्या रथाची गावातून मिरवणूक |
| रात्री १०-०० ते सकाळी ६-०० (१९-१०-१९९१) | कलाकारांची श्रींच्या समोर हजेरी (समाधीमंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहील.) |

तृतीय दिन, शनिवार, दिनांक १९-१०-१९९१

| | |
|---|---|
| सकाळी ६-०० | श्रींचे मंगलस्नान व दर्शन |
| सकाळी ७-३० | गुरुस्थानमंदिरात रुद्राभिषेक |
| सकाळी ८-०० | श्रींना अर्पण केलेली पवित्र वस्त्रे वगैरेंची जाहीर लिलावाने प्रसादरुपाने विक्री |
| दुपारी १२-३० | माध्यान्ह आरती व तीर्थप्रसाद |
| दुपारी ३-०० ते ५-०० | कीर्तन |
| सायंकाळी ६-०० | धूपारती |
| सायंकाळी ७-३० ते ९-४५ | निमंत्रित कलाकारांचा गायनाचा कार्यक्रम |
| रात्रौ १०-०० | शेजारती |
| रात्रौ ११-०० | निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम |

उत्सव सांगता दिन, रविवार, दिनांक २०-१०-१९९१

| | |
|---|---|
| सकाळी ५-१५ | श्रींची काकड आरती |
| सकाळी ६-०० | श्रींचे मंगलस्नान व दर्शन |
| सकाळी ८-०० | श्रींना अर्पण केलेली पवित्र वस्त्रे वगैरेंची जाहीर लिलावाने प्रसादरुपाने विक्री |
| सकाळी १०-०० | गोपालकाला कीर्तन व दहीहंडी कार्यक्रम |
| दुपारी १२-३० | माध्यान्ह आरती व तीर्थप्रसाद |
| सायंकाळी ६-०० | धूपारती |
| सायंकाळी ७-३० ते ९-४५ | निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम |
| रात्रौ १०-०० | शेजारती |
| रात्रौ ११-०० | निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम |

**टीप :** (१) अखंड पारायणात भाग घेऊ इच्छिणाऱ्या साईभक्तांनी आपली नावे दिनांक १६-१०-९१ रोजी मंदिर कार्यालयात नोंदवावीत. त्यांची चिठ्ठ्या काढून निवड करण्यात येईल. (२) मुख्य दिवशी, दिनांक १८-१०-९१ रोजी होणाऱ्या कलाकारांच्या हजेरी कार्यक्रमासाठी कलाकारांनी आपली नावे याचदिवशी समाधीमंदिरात संस्थानगवई यांच्याकडे नोंदवावीत. (३) उत्सवकाळात अभिषेक पूजा व सत्यनारायण पूजा होणार नाहीत. (४) सोईप्रमाणे कार्यक्रमात बदल करण्यात येईल.

## "बाबांची शिकवण आचरणात आणणे हीच खरी साईसेवा!"

"श्री साईबाबांची शिरडी ही सर्वजातीधर्मातील लोकांचे श्रद्धास्थान आहे. त्यांनी मनुष्यदेहात असताना कोणताही भेदभाव न बाळगता सेवाधर्म आचरण्याची शिकवण स्वतःच्या कृतीतून दिली. त्यांची ही शिकवण प्रत्येकाने आचरणात आणली पाहिजे. तीच खरी साईसेवा होय!" असे उद्‌गार भारताचे माननीय उपराष्ट्रपती डॉ. शंकरदयाळ शर्मा यांनी अलिकडे शिरडी येथे काढले.

दिनांक ९ जुलै, १९९१ रोजी सकाळी १० च्या सुमाराला मा. उपराष्ट्रपती यांचे त्यांनी सुविद्य पत्नी, नात व महाराष्ट्र राज्याच्या मा. आरोग्य मंत्री श्रीमती पुष्पाताई हिरे यांच्यासोबत श्री साईबाबांच्या दर्शनाकरिता कडेकोट सुरक्षा-व्यवस्थेत शिरडी येथे आगमन झाले.

त्यांच्या स्वागतासाठी संस्थानच्या माननीय अध्यक्षा प्रो. डॉ. लेखा पाठक, मा. आमदार अण्णासाहेब म्हस्के, विधानपरिषदेचे उपसभापती मा. सूर्यभान पा. वहाडणे, जिल्हा कॉंग्रेस सेवादलाचे मा. अध्यक्ष श्री. बिपीनराव कोल्हे आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती.

मा. उपराष्ट्रपती यांनी सपत्नीक समाधीमंदिरात जवळ जवळ तासभर प्रसन्न वातावरणात अभिषेक व पूजा केली. याबाबत त्यांनी आपले समाधानही व्यक्त केले. त्याचप्रमाणे मा. उपराष्ट्रपती माध्यान्ह आरतीला उपस्थित होते. त्यानंतर दुपारी सुमारे पावणेएकच्या सुमाराला मा. उपराष्ट्रपती नाशिकला रवाना झाले.

मा. उपराष्ट्रपती यांच्या ह्या शिरडी-भेटीच्या वेळी संस्थानचे मा. विश्वस्त सर्वश्री बाबा नरोडे, गोपिनाथ कोते पाटील, श्रीपतराव जाधव, कारभारी देवकर, प्रभाकर बोराव्के, एस्. एम्. धोरडे, भीमाशंकर खांबेकर, डॉ. इ. बी. गोंदकर, मोतीराम पवार, एस्. आर. शिंदे, उत्तमराव शेळके, मा. आ. श्री. बाळासाहेब थोरात, मा. श्री. अप्पासाहेब देवकर, मा. श्री. रावसाहेब म्हस्के, मा. ॲड. आर. जी. चिने, मा. प्रांताधिकारी श्री. संजय चहांदे आदी प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती.

संपादकीय

# "....मी कानात फुंकणारा गुरु नव्हे...."

मनुष्याला प्रत्येक क्षेत्रात, मग ते क्षेत्र सामाजिक, शैक्षणिक, व्यावहारिक, राजकीय किंवा आध्यात्मिक असो, मार्गदर्शनाची आवश्यकता ही असतेच. आध्यात्मिक क्षेत्र वगळता अन्य क्षेत्रातील गुरु आपला देह क्षीण होईपर्यंत किंवा त्याचे अस्तित्त्व नष्ट होईपर्यंत मार्गदर्शन करू शकतात; परंतु आध्यात्मिक क्षेत्रातील गुरुमध्ये आपल्याला जन्म-मृत्युच्या फेऱ्यांमधून मुक्त करण्याचे सामर्थ्य असते. हा गुरु आपल्या शिष्यावर सतत कृपादृष्टी ठेवून असतो, त्याला अज्ञात गोष्टींची ओळख करून देतो, सर्वप्रकारच्या ऐहिक क्लेशांतून मुक्त करून आत्मसाक्षात्कार घडवितो, प्रत्यक्ष ब्रह्माचे दर्शन घडवितो. पारमार्थिक क्षेत्रात असा गुरु मिळणे दुर्लभ असते; आणि तो जरी मिळाला तरी त्याची मर्जी संपादन करणे त्याहूनही कठीण असते. शिष्याला त्याच्या अनेक कसोट्यांमध्ये उतरावे लागते, नानाविध दिव्यांतून जावे लागते. आपल्या बाबांनी त्यांच्या गुरुविषयी स्वत: प्रत्यक्ष असा उल्लेख केला नसला तरी त्यांच्या अप्रत्यक्ष बोलण्यातून त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य गुरुला अर्पण केले होते, हे आपल्याला श्री साईसत्चरितात वाचावयास मिळते. एकदा खाशाबा देशमुख यांची आई बाबांनी आपल्याला काही गुरुमंत्र द्यावा म्हणून उपोषणाला बसली. बाबांना हे जेव्हा कळले तेव्हा त्यांनी तिला आपल्याजवळ बोलावून घेतले व सांगितले "....होता पहा माझा गुरु। मोठा अवलिया कृपासागरु। थकलों तयाची सेवा करकरुं। कानमंतरु देईना।।४७।। माझ्याही मनीं प्रबळ आस। कधीं न सोडावी तयाची कांस। तया मुखेंच घ्यावें मंत्रास। दीर्घ सायास करूनि।।४८।। आरंभीं तयानें मज मुंडिलें। पैसे मज दोनचि याचिले। ते मीं तात्काळ देऊनि टाकिले। बहु मीं प्रार्थिलें मंत्राक्षर।।४९।। माझा गुरु पूर्णकाम। दोन पैशांचें काय काम। कैसें म्हणावें त्या निष्काम। शिष्यांसी दाम मागे जो।।५०।। ऐसी न शंका येवो मना। व्यावहारिक पैशाची न त्या कामना। ही तों नाहीं तयाची कल्पना। कर्तव्य कांचना काय त्या।।५१।। निष्ठा आणि सबूरी दोन। हेच ते पैसे, नव्हते आन। म्यां ते तेव्हांच टाकिले देऊन। तेणें मज प्रसन्न गुरुमाय।।५२।। धैर्य तीच गे बाई सबूरी। सांडूं नको तिजला दूरी। पडतां केव्हांही जडभारी। हीच परपारीं नेईल।।५३।। पुरुषांचें पौरुष ती ही सबूरी। पाप ताप दैन्यता निवारी। युक्तिप्रयुक्तीं आपत्ति वारी। बाजूस सारी भय भीती।।५४।। सबूरीवरी यशाचा वांटा। विपत्ती पळवी वाट वाटा। येथ अविचाराचा कांटा। नाहीं ठावुका कोणाही।।५५।। सबूरी सद्गुणांची खाणी। सद्विचाररायाची हे राणी। निष्ठा आणि ही सख्या बहिणी। जीव प्राण दोघींसी।।५६।। सबूरीवीण मनुष्यप्राणी। स्थिति तयाची दैन्यवाणी। पंडित असो कां मोठा सद्गुणी। व्यर्थ जिणें हिजवीण।।५७।। गुरु जरी महा प्रबळ। अपेक्षी शिष्यप्रज्ञाच केवळ। गुरुपदीं निष्ठा सबळ। धैर्यबळ सबूरी।।५८।। जैसा दगड आणि मणी। उजळती दोन्ही घासितां सहाणीं। परी दगड राहे दगडपणीं। मणी तो मणी तेजाळ।।५९।। एकचि संस्कार दोघां उजळणी। दगडा चढेल काय मण्याचें पाणी। घडेल मण्याची सतेज हिस्कणी। दगड निजगुणीं तुळतुळीत।।६०।। बारा वर्षें पायीं वसवटा। केला गुरूनें लहानाचा मोठा। अन्नवस्त्रासी नव्हता तोटा। प्रेम पोटांत अनिवार।।६१।। भक्तिप्रेमाचा केवळ पुतळा। जयास शिष्याचा खरा जिव्हाळा। माझ्या गुरूसम गुरु विरळा। सुखसोहळा न वर्णवे।।६२।। काय त्या प्रेमाचें करावें वर्णन। मुख पाहतां ध्यानस्थ नयन। आम्ही उभयतां आनंदघन। अन्यावलोकन नेणों मी।।६३।। प्रेमें गुरुमुखावलोकन। करावें म्यां रात्रंदिन। नाहीं मज भूक ना तहान। गुरूवीण मन अस्वस्थ।।६४।। तयावीण नाहीं ध्यान। तयावीण न लक्ष्य आन। तोच एक नित्य अनुसंधान। नवलविंदान गुरूचें।।६५।। हीच माझ्या गुरूची अपेक्षा। कांहीं न इच्छी तो यापेक्षां। केली न माझी केव्हांही उपेक्षा। संकटीं रक्षा सदैव।।६६।। कधीं मज वास पायांपाशीं। कधीं समुद्र-परपारासी। परी न अंतरलों संगमसुखासी। कृपादृष्टीसीं सांभाळी।।६७।। कासवी जैसी आपुले पोरां। घालिते निजदृष्टीचा चारा। तैसीच माझे गुरूची तऱ्हा। दृष्टीनें लेंकरा सांभाळी।।६८।। आई या मशिदींत बैसून। सांगतों तें तूं मानीं प्रमाण। गुरूनें न फुंकले माझेच कान। तुझे मी कैसेन फुंकरूं।।६९।। कासवीची प्रेमदृष्टी। तेणेंच पोरांसी सुखसंतुष्टी। आई उगीच किमर्थ कष्टी। उपदेशगोष्टी नेणों मी।।७०।। कासवी नदीचे एके तटीं। पोरें पैल वाळवंटीं। पालन पोषण दृष्टादृष्टी। व्यर्थ खटपटी मंत्राच्या।।७१।। तरी तूं जा अन्न खाईं। नको हा घालूं जीव अपायीं। एक मजकडे लक्ष देईं। परमार्थ येईल हातास।।७२।। तूं मजकडे अनन्य पाहीं। पाहीन तुजकडे तैसाच मीही। माझ्या गुरूनें अन्य कांहीं। शिकविलें नाहींच मजलागीं।।७३।। नलगे साधनसंपन्नता। नलगे

(पृष्ठ क्र. १३ वर)

# सबका मालिक एक

भारत देश त्याच्या विविधतेसाठी प्रसिद्ध आहे. भारतात अनेक धर्म, अनेक जाती व पंथ आहेत. विविध भाषा आहेत. प्रत्येक धर्मानुसार, पंथानुसार त्यांची दैवते आहेत. उपास्य देवता आहेत. तरीसुद्धा आम्ही सारे एका भारतमातेची लेकरे आहोत. अशी विविधता लाभलेली ही भारतमाता महान आहे. त्यातहि महान संतांना, योग्यांना जन्म देवून ती पुण्यभूमि बनली आहे.

त्यातील कांही संतांनी आपल्या महाराष्ट्रात जन्म घेवून महाराष्ट्राची भूमि पुण्यवान बनविली. समाजाला त्या त्या विशिष्ट परिस्थितीत योग्य मार्गदर्शन केले. जातिभेद, वर्णभेद, उच्च-नीच हे भेद नाहीसे करण्याचा प्रयत्न केला.

ह्या संतांत श्री साईबाबांचे स्थान अतिशय महत्त्वाचे व उच्च आहे. इतर संतांसारखे बाबांनी ओव्या, अभंग, ग्रंथ यासारखे काही लिहिले नाही. पण समाजाला वाङ्मयाद्वारे शिकविण्यापेक्षा प्रत्यक्ष आपल्या वागणुकीतून, कृतितून मानवधर्म, सेवाधर्म, बंधुभाव, भूतदया इ. शिकवणुकीचे धडे दिले. हे कार्य बाबांनी ७० वर्षांपूर्वी शिरडीसारख्या एका छोटयाशा खेडयात केले.

त्यावेळेची खेडयातील परिस्थिती व आजची खेडयातील परिस्थिती यात खूपच अंतर आहे. वर्ण-भेद, जातिभेद, स्पृश्य-अस्पृश्य, सोवळे-ओवळे ह्यांना शहरासारख्या ठिकाणी सुद्धा अतिशय महत्त्व होते. तेथे खेडयाची परिस्थिती कशी असेल ह्याची कल्पना येते. अशा परिस्थितीत एका अनामिक, ज्याच्या आईवडिलांचा, गणगोताचा पत्ता नव्हता अशा फकिराने शिरडीसारख्या खेडयात अचानक प्रकट होवून तेथील समाजाला सुयोग्य वळण लावणे, त्यांच्यात बंधुभाव वाढीस लावणे, ही सोपी गोष्ट नव्हती. समाज प्रवाह बदलविणे, त्यातील अनिष्ट गोष्टींना विरोध करणे ही फार कठीण गोष्ट आहे. ती सर्वांना जमणार नाही. मग तो कितीहि प्रकांड पंडित असो. ज्ञानी असो. त्याकाळी सुद्धा त्या योग्यतेच्या व्यक्ती जन्मास आल्या असतील पण हे समाजसुधारणेचे काम सर्वांनाच करता आले नाही.

श्री साईबाबांनी बंधुभावाचे धडे देतांना आपण सारे एकाच ईश्वराची लेकरे आहोत. जाती-धर्म हे सर्व मानवनिर्मित आहेत. राम-रहिम एकच आहेत म्हणून आपण साऱ्यांनी एकत्र येवून एकदिलाने राहिले पाहिजे. त्यासाठी सहभोजनाची प्रथा त्यांनी सुरू केली. ते स्वतः ते अन्न एका मोठया हंडीत शिजवित.

**''भिजली डाळ पाटयावरती। घालूनिया स्वयें निवडीती। स्वयें वरवंटा घेवूनि वाटिली। मुगवडया बनविती निजहस्ते॥८५॥ मग त्या हंडीत हळूच सोडिती। खाली न लागाव्या म्हणुनी घाटिती। तयार होता हंडी उतरिती। प्रसाद वांटिती सकळिकां॥८६॥ सकळिकां कां म्हणतील श्रोते। साईबाबा तों यवन होते। मग ऐसिया अधर्मचरणातें। जाहले करविते कैसेनी॥८७॥ या शंकेचें एकचि उत्तर। धर्म आणि अधर्म विचार। साईपाशी हें साचार। निरंतर जागत॥८८॥** –अध्याय ३८

हे हंडीतील अन्न बाबा सर्वांस एकत्र बसवून आपल्या हाताने वाढीत. ह्या हंडीत अन्न शिजवून ते सर्वांस वाढण्यामागे बंधुभाव वाढीस लागावा हा उद्देश होताच पण त्याचप्रमाणे उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, स्पृश्य-अस्पृश्य हे भेद पण नाहीसे व्हावे ह्यासाठी बाबांनी केलेले ते प्रयत्न होते. म्हणून रामनवमीच्या उत्सवाबरोबर संदल मिरवणुकीसहि त्यांनी मुभा दिली.

**जात हिंदु की मुसलमान। थांग न लागला अणुप्रमाण। उभय वर्गा समसमान। जयांचे वर्तन सर्वदा॥५॥ रामनवमी हिंदुंचा सण। करवीतसे स्वयें आपण। सभामंडपीं पाळणा बांधवून। कथा कीर्तन करवीत॥६॥ चौकान सन्मुख लागे पाळणा। करवूनी घेती रामकीर्तना। तेचि रात्रीं संदल मिरवणा। अनुज्ञा यवनांहि देत॥७॥ जमवुनि जमतील तितुके यवन। समारंभे संदल-मिरवण। उभय उत्सव समसमान। घेत करवुन आनंदे॥८॥** –अध्याय ७

बाबांची स्थिती **नाही जयासी देहाभिमान। असो हिंदु वा मुसलमान। सकल वर्ण समसमान। तया न भिन्नपण जातीचे॥२०॥** –अध्याय ७ अशी होती.

सर्व धर्म एक आहेत पण त्याचबरोबर ईश्वरहि एक आहे. हे त्यांनी वेळोवेळी आपल्या कृतीतून पटवून दिले आहे. हिंदु धर्मात अनेक दैवते आहेत. कोणाची उपास्य देवता गणपती तर कोणाची उपास्य देवता हनुमान. कोणी विठ्ठलाचे उपासक तर कोणी श्रीलक्ष्मीमातेचे. अशा वेळेस बाबा त्यांना सप्रमाण सिद्ध करून दाखवित की शेवटी सर्व रूपे एकाच ईश्वराची आहेत. तुम्हाला ज्याची उपासना करावीशी वाटेल त्याची करा. त्याच्यात बदल करू नका. पण इतरांना कमी पण लेखू नका. अनादर दाखवू नका.

**एकदा काकासाहेब दीक्षित। नियमानुसार प्रातःस्नान। असतां आसनस्थित ध्यानस्थ। दर्शन पावत विठ्ठलाचें॥८९॥ पुढें जातां बाबांचे दर्शना। नवल बाबा पुसती तयांना। ''विठ्ठल पाटील आला होता ना?। भेट झाली ना? तयाची॥९०॥ मोठा पळपुटया बरें तो विठ्ठल। मेख मारुनि करीं त्या अढळ। दृष्टि चुकवूनि काढील पळ। होता पळ**

एक दुर्लक्ष॥९१॥ –अध्याय ९

या ठिकाणी ज्याने त्याने आपल्या आवडत्या ईश्वराच्या, दैवतान्मीच उपासना करावी व कोणत्याहि दैवताची केली तरी ती अखिल विश्वाला व्यापून राहिलेल्या परमेश्वरालाच पोचते. हे बाबांना दाखवून द्यायचे होते.

नाशिकच्या मुळेशास्त्रीच्याकडून बाबांनी बुटींना पाठवून दक्षिणा मागितली. मुळे सोवळे वस्त्र नेसून बसले होते. बुटींकडून दक्षिणेसंबंधी निरोप मिळताच त्यांच्या मनांत आले की, मी अग्निहोत्री ब्राह्मण, बाबा मोठे संत पण त्यांनी माझ्याकडे दक्षिणा का मागावी आणि मी तरी त्यांना का द्यावी?

**निरोप परिसता ते अवसरीं। विक्षेप दाटला मुळ्यांचे अंतरी। दक्षिणा किमर्थ म्यां द्यावी तरी। मी अग्निहोत्री निर्मळ॥१२१॥ असतील बाबा मोठे संत। परी मी काय तयांचा अंकित। मजपाशी का दक्षिणा मागत। जाहले दुश्चित मन तेणें॥१२२॥** –अध्याय १२

तरी सुद्धा मुळे शास्त्री मशिदीत गेले त्यांना येत नाही असेहि म्हणता येईना. ते सभामंडपात गेले पण दूर उभे राहीले. आपण सोवळ्यात आहोत याचा त्यांना विसर पडेना म्हणून लांबूनच त्यांनी बाबांवर पुष्पवृष्टी केली. आणि इतुक्यात **ऐसा चमत्कार। झाला तयांचे दृष्टीसमोर। बाबा अदृश्य गादीवर। घोलप गुरुवर दिसले तैं॥१२८॥ इतरांस नित्याचे साईसमर्थ। मुळ्यांचे डोळां घोलपनाथ। ते जरी पूर्वीच ब्रह्मीभूत। आश्चर्यचकित बहु मुळे॥१२९॥ गुरु जरी वस्तुतः समाधिस्थ। तेहि जैं दृष्टिगोचर भासत। तेणें मुळे अति विस्मित। तैसेचि साशंकित मानसी॥१३०॥ स्वप्न म्हणावें नाहीं निजेला। जागृति तंव गुरु कैसा ठेला। संभ्रम केउता जीवीं उठला। बोल खुंटला क्षणभरी॥१३१॥ आपुला आपण घेई चिमटा। म्हणे नव्हे हा प्रकार खोटा। किमर्थ मना हा संशय फुकटा। सर्वांसकटा मी येथें॥१३२॥ मुळे मूळचे घोलपभक्त। बाबांविषयीं जरी शंकित। परी झाले पुढें अंकित। अकलंकित मानसें॥१३३॥ स्वयें वर्णाग्रज ब्राह्मण। वेदवेदांगशास्त्रसंपन्न। मशिदींत घोलपदर्शन। विस्मयापन्न जाहले॥१३४॥ मग वरती गेले चढोन। निजगुरूचे चरण वंदून। उभे राहिले कर जोडून। वाचेसी मौन पडियेलें॥१३५॥ भगवीं वस्त्रें भगवी छाटी। घोलपस्वामी देखोनि दृष्टी। धांवोनि पायीं घातली मिठी। उटाउठीं मुळ्यांनीं॥१३६॥ तुटला उच्चवर्णाभिमान। पडलें डोळियांमाजीं अंजन। भेटतां निजगुरु निरंजन। निधानसंपन्न ते झाले॥१३७॥ हरपली विकल्पवृत्ति। जडली बाबांवरी प्रीति। अर्धोन्मीलित नेत्रपातीं। टक लाविती साईपदीं॥१३८॥** –अध्याय १२ हे दृश्य पाहून मुळेशास्त्री विस्मितच झाले. आपण स्वप्नात तर नाही ना असे त्यांना वाटले. त्यांनी स्वत:लाच चिमटा काढला व मनाशी म्हणाले हे कसे शक्य आहे? इतरांस श्री साईबाबा स्पष्ट दिसत होते. इतर भक्त त्यांचीच आरती करीत होते. पण मुळेशास्त्रींना मात्र वारंवार खात्री करूनहि घोलपस्वामीच दिसत होते. भगवी वस्त्रे भगवी छाटी दिसत होती. मुळेशास्त्री सद्‌गदित अंत:करणाने पुढे झाले आपल्या गुरुचा जयजयकार केला व आपल्या गुरुमहाराजांचे चरण पकडले. काही वेळानंतर ते उठले आणि पाहिले तो घोलपस्वामी अदृश्य झाले असून त्या जागी श्री साईनाथ त्यांच्या दृष्टिस पडले. या संदर्भात विशेष लक्षात घेण्याजोगी गोष्ट म्हणजे त्याचदिवशी सकाळी बाबांनी याची पूर्वकल्पना अन्य भक्तांना दिली होती. ती अशी: **इकडे नित्यक्रमानुसार। बाबा निघाले लेंडीवर। म्हणती गेरू घ्या रे बरोबर। भगवें अंबर परिधानूं॥१०९॥ सर्वांस वाटला चमत्कार। गेरूचें बाबा काय करणार। जो तो करूं लागे विचार। गेरू स्मरला आज कां॥११०॥ बाबांची ऐसीच संदिग्ध वाणी। काय अर्थ जाणावा कोणीं। परी आदरें सांठविल्या श्रवणीं। अर्थश्रेणी बोगरिती॥१११॥ कीं ते संतांचे बोल। कधींही जे नसणार फोल। अर्थभरित सदा सखोल। करवेल मोल कवणातें॥११२॥ आधीं विचार मग उच्चार। हा तों नित्याचा व्यवहार। उच्चारामागें आचार। संत साचार आदरिती॥११३॥** –अध्याय १२

साईनाथांची ती आनंदी मूर्ती पाहता मुळेशास्त्री सोवळे-ओवळे, तहान-भूक विसरले आणि त्यांना अतिशय आनंद झाला. त्यांच्या मनातील संशय, विकल्प सारे दूर झाले. डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. कंठ सद्‌गदीत झाला. त्यांचे अष्टभाव जागृत झाले. बाबांची लिला पाहून त्यांना गहिवरून आले. सर्वत्र एकच परमात्मा आहे व त्याने साईनाथाच्या रूपाने या मशिदीत वास्तव्य केले आहे. आपण मात्र उगाच भेदभाव करीत होतो हे त्यांना समजले. हा सारा प्रसंग पाहून मशिदीत हजर असलेल्या सर्व भक्तांना पण बाबांच्या लीलेचे कौतुक वाटून गहिंवरून आले.

अशाच प्रकारे एक डॉक्टर जातीने ब्राह्मण असून रामाचे उपासक होते. ते मामलेदाराच्या बरोबर शिरडीला आले होते. परंतु येतांना त्यांनी मामलेदारांना सांगितले की, तुमच्या बरोबर मी शिरडीस येईन परंतु मी बाबांना नमस्कार करणार नाही. मुसलमानाच्या पाया पडण्यास माझे मन तयार नाही. मामलेदारांनी त्यांची अट मान्य केली व बाबांना नमस्कार करण्यास आपण आग्रह करणार नाही असे आश्वासन दिले. दोघे शिरडीस आले व द्वारकामाईत गेले आणि एक नवलच घडले–

**परी आश्चर्य जैं शिरडीस आले। दर्शनार्थ मशिदींत गेले। आरंभीं त्यांनीच लोटांगण घातलें। विस्मित झाले बहुस्नेही॥१५८॥ तंव ते पुसती तयांते। कैसे विसरला**

कृतनिश्चयातें। आम्हां आधींच लोटांगणातें। मुसलमानातें घातलें कैसें॥१५९॥ मग ते डॉक्टर कथिती नवल। रामरूप त्या देखिले शामल। तें मी तात्काळ वंदिले निर्मल। सुंदर कोमल साजिरें॥१६०॥ तेंचि पहा हें आसनस्थित। तेंचि हें सर्वांसवें बोलत। म्हणतां म्हणतां क्षणार्धात। दिसू लागत साईरूप॥१६१॥ तेणे डॉक्टर विस्मयापन्न। म्हणावे तरी हें काय स्वप्न। म्हणे हे कैंचे मुसलमान। योगसंपन्न अवतारी॥१६२॥ – अध्याय १२

अशाप्रकारे डॉक्टरांच्या उपास्यदेवतेचे श्रीरामाचे दर्शन डॉक्टरांना घडले व त्यांना समजले की बाबा म्हणजे योग्याचा अवतार आहे. क्षणात साई क्षणात राम अशी रूपे दाखवून त्यांनी डॉक्टरांचा अहंकार नाहीसा केला व परमात्मतत्त्व सर्वत्र एकच आहे. कोणत्याहि देवाला केलेला नमस्कार शेवटी त्या परम तत्त्वालाच पोचतो हे दाखवून दिले. परंतु ही शिकवण प्रवचन, वाङ्मय अशा माध्यमातून देण्याऐवजी त्याला सुयोग्य, असे प्रसंग घडवून आणून त्यातूनच त्यांनी दिली आहे.

श्री साईनाथांनी मानवताधर्म, बंधुभाव, एकेश्वरवादाची शिकवणुक देतांना आपल्या भक्तांना भूतदयेचीहि शिकवणुक दिली आहे व त्या प्राण्यात सुद्धा मीच आहे असे अनेक प्रसंगातून पटवून दिले आहे.

एकदा एक बाई जेवावयास बसल्या होत्या. एवढ्यात दारावर एक कुत्रा आला. त्यांनी त्यास एक चतकोर भाकरी खावयास घातली. ही गोष्ट सहजपणे घडून गेली. दुपारी जेवण झाल्यानंतर नित्य-नियमाप्रमाणे त्या बाई मशिदीत येवून बसल्या. तेव्हां बाबा म्हणाले – "आई त्वां आज मज जेवूं घातलें। तेणें हे आकंठ पोट भरले। होते हे प्राण व्याकुळ झाले। ते तृप्त केले गे तुवां॥१२०॥" बाबा पुढे म्हणाले, अशाचप्रकारे दया करावी. भुकेलेल्यास आधी भाकर द्यावी. आपुल्या पोटासाठी नंतर खावी. हे नीट लक्षांत ठेव. हे ऐकतांच बाई आश्चर्यचकित झाल्या. त्यांना बाबांच्या बोलण्याचा अर्थबोधच होईना. त्या बाबांना म्हणाल्या, मी कशी तुम्हाला भाकर वाढीन. मीच येथे दुसऱ्याच्या घरी पैसे देवून मिळेल ते अन्न खाते. त्यावर बाबांनी प्रत्युत्तर दिले "सेवूनियां ती प्रेमाची भाकर। जाहलो मी तृप्तनिर्भर। अजून मजला येती ढेकर" ॥१२५॥ तू जेवावयास बसली असता जो श्वान व (सूकर) डुक्कर तुला दिसले त्यांचा व माझा आत्मा एकच आहे. बाबा पुढे म्हणाले, "कधीं मी श्वान कधीं सूकर। कधीं मी गाई कधी मांजर। कधीं मुंगी माशी जलचर। ऐसिया विचरत रूपें मीं॥१२९॥ – अध्याय ९

बाबांच्या उपदेशवाणीत प्राणीमात्रांवर दया करणे, सर्वांशी प्रेमाने वागणे ह्या गोष्टींवर जास्त जोर होता. बाबा तर स्वतः दयेचा सागर होते. करुणा आणि प्रेम त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडत असावे असे वाटते. म्हणून आपल्या उपदेशात भक्तांना नेहमीच्या जीवनात कसे वागावे हे सांगताना ते म्हणतात –

"नसल्या लागावांधा काही। कोणीहि कोठेंचि जात नाही। नरास काय पशुपक्ष्यांहि। न करी कुणाहि हडहड॥१४१॥ आल्यागेल्याचा आदर करीं। तृषिता जल भुकेल्या भाकरी। उघड्यास वस्त्र बसाया ओसरी। देता श्रीहरी तुष्टेल॥१४२॥

बाबांचा हा उपदेश किती मौल्यवान व सार्थ आहे. बाबा म्हणायचे कोणीहि व्यक्ती पूर्वजन्मातील काही लागेबांधे असल्याशिवाय एकमेकाजवळ येत नाही. म्हणून कोणासहि अगदी पशुपक्ष्यांनाहि हडहड करून झिडकारू नका. दारावर आलेल्याला अन्न, पाणी, वस्त्र, निवारा द्या. बाबा पुढे असेहि म्हणत दानधर्म करण्याची तुमची इच्छा नसली अगर ऐपत नसली तर करू नका. पण दान मागण्यासाठी आलेल्या व्यक्तीचा अपमान करू नका. त्याला हाकलवू नका. किती अमोल विचार आहेत बाबांचे.

बाबांचे मानवताधर्म, एकेश्वरवाद, भूतदया, इत्यादि बद्दलचे ७० वर्षांपूर्वीचे विचार, उपदेश यांचा झालेला परिणाम आज इतक्या वर्षांनी आपल्याला शिरडीत पहावयास मिळतो. बाबांनी त्याकाळी केलेल्या प्रयत्नांना निश्चितच यश आले आहे म्हणून आज शिरडीस सर्व धर्मांचे, सर्व जातीचे, सर्व भाषांचे, सर्व प्रांताचे लोक बाबांच्या कृपाछत्राखाली समाधिमंदिरात एकाच छताखाली एकत्र येवून बाबांची सेवा करीत आहेत. सगळे मिळून भजन, पूजन, आरती करीत आहेत. तेथे कोणी उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, स्पृश्य-अस्पृश्य ह्याचा भेद मानीत नाही. तेथे कोणी ब्राह्मण-शूद्र, हिंदु-मुस्लिम, शीख, पारसी हे भेद मानीत नाही. आम्ही सारे या साईमाउलीची लेकरे आहोत. आमच्या लाडक्या, प्रेमळ, दयाळू साईमाउलीस आम्ही भेटावयास आलो आहोत. तिच्या कुशीत शिरून तिच्या समाधीवर माथा टेकला की बस्स. आम्ही आमचे सारे ताप, चिंता, काळज्या विसरून जातो आणि माउलीच्या सेवेत आनंदाने मग्न होतो. असे भाव सर्व भक्तांच्या चेहऱ्यावर असतात. साईमाउलीचे दर्शन झाल्याचा आनंद चेहऱ्यावर असतो.

श्री साईमाउली हे दैवत. श्री साईंनी शिकविलेला मानवताधर्म हा साईधर्म सर्व जाती धर्मांचे भक्त आज पालन करीत आहेत. बाबांनी लावलेल्या त्यांच्या शिकवणुकीच्या रोपट्याचा आज प्रचंड वृक्ष झाला आहे. असे आज शिरडीतील दृश्य पाहून वाटते.

– **सौ. प्रविणा कांबळी** एम.ए.
मानद सहाय्यक कार्यकारी संपादिका

---

# गुरुविन अनुभव कैसा मिळे

–श्री. चंद्रकांत गरगटे
गुरुवार पेठ, सातारा.

विश्व प्रकाशकं ब्रह्म, ब्रह्म प्रकाशको गुरु:।
गुरु देवात्परो नास्ति तस्मात् सद्गुरवे नम:॥

वरील उक्तीप्रमाणे ब्रह्म हे संपूर्ण विश्वाला प्रकाशित करते आणि त्या अव्यक्त ब्रह्माला प्रत्यक्ष गुरुदेव साक्षात्काराद्वारे प्रकाशित करतात. यावरून सद्‌गुरुंचे माहात्म्य परब्रह्मापेक्षाही फार मोठे आहे. गुरुदेवापेक्षा श्रेष्ठ देव त्रैलोक्यात दुसरा कोणताच मिळणे शक्य नाही. केवळ सद्‌गुरु हेच आत्मब्रह्मप्रकाशक आहेत. म्हणून त्या राजाधिराज योगिराज परब्रह्म अनंतकोटी ब्रह्मांडनायक सद्‌गुरु श्री साईबाबांना माझे अनन्यभावे अखंड नमन आहे.

गुरुपौर्णिमेला व्यासपौर्णिमा असेही दुसरे नाव आहे. आषाढ महिन्यात साजरी केली जाणारी जी ही गुरुपौर्णिमा आहे ती महाभारत, वेद व पुराणे यांचा जन्म ज्यांच्यापासून झाला त्या व्यासमुनींच्या स्मृतीप्रित्यर्थ साजरी करण्याची प्रथा आहे.

म्हणूनच व्यासांच्या बाबतीत असे म्हटले जाते–

"नमोस्तु ते व्यास विशाल बुद्धे
फुल्लार विंदायत पत्रत्र नेत्र।
येन त्वया भारत तैल पूर्ण:
प्रज्वालितो ज्ञानमय प्रदीप:॥"

असे म्हणून व्यासांना वंदन करण्याची प्रथा आहे. या श्लोकाचा अर्थ असा की फुललेल्या कमळासारखे ज्यांचे आकर्षक नेत्र आहेत, ज्यांची बुद्धी विशाल आहे, अशा हे व्यासमुने, तुम्ही भारतरूपी तेलाने भरलेला ज्ञानदीप प्रज्वलित केलात त्या तुम्हालाही माझा नमस्कार असो.

'गुरु' या शब्दाची व्याख्याच अशी आहे की 'गु'–म्हणजे अंध:कार आणि 'रु'–म्हणजे प्रकाश. अर्थात, जो आत्मज्ञानप्रकाशाने स्वशिष्यामधील–अज्ञानांधकार तत्काल नष्ट करतो तो गुरु. सर्व स्वानुभवी साधुसंत तसेच भक्तयोग्यांनीसुद्धा सद्‌गुरुबद्दल–"गुरु प्रत्यक्ष ब्रह्मा-विष्णू-महेशरूप आहे"–"गुरु साक्षात् परब्रह्म परमेश्वर आहे" असे धन्योद्‌गार काढलेले आहेत.

सारांश, सद्‌गुरुंचा महिमा अचिंत्य, अगम्य व अगाध आहे. सद्‌गुरु हे कृपासिंधु आहेत.

सद्‌गुरु रामदास स्वामी–"जय जय रघुवीर समर्थ" असा जयघोष करून जेव्हा छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्यापुढे येऊन उभे राहिले तेव्हा त्या महान थोर शिष्याने ताबडतोब एका कागदावर स्वत:च्या सही-शिक्क्यानिशी "हे संपूर्ण राज्य श्री सद्‌गुरुचरणी अर्पण केले आहे", असे लिहून तो सरकारी कागद समर्थांच्या झोळीत दोन्ही हातांनी प्रेमादरपूर्वक अर्पण केला व साष्टांग वंदन करून छत्रपती श्री शिवाजी महाराज समर्थांच्या समोर हात जोडून उभे राहिले. समर्थांनी तो कागद उलगडून वाचला व किंचित् स्मितहास्य करून परम धन्यतापूर्वक समर्थ म्हणाले, "शिवबा! तू धन्य आहेस. तू खरोखरीच त्यागमूर्ती श्री शिवाचा अंश आहेस. पण बाबा, हा कागद घेऊन आम्ही करणार तरी काय! त्यापेक्षा एक मूठभर तांदूळ घातले असतेस तर पोटाची भूक तरी शमली असती." असे सहज म्हणून–"आता हे राज्य श्री समर्थ रामरायाचे समजून तू ते यापुढे प्रतिनिधीरूपाने चालव", असा दिव्य आदेश देऊन तो कागद समर्थांनी परत शिवरायांच्या स्वाधीन केला. धन्य आहे तो महात्यागी शिष्य व धन्य आहेत ते परमथोर सद्‌गुरु. अशांचा सदैव सर्वत्र जयजयकार असो.

सद्‌गुरुंचा कळीकाळालाही भयंकर धाक आहे. सर्वसमर्थ सद्‌गुरुंच्या शिष्याकडे वक्रदृष्टीने पाहण्यास संपूर्ण भूमंडळात कोणीच समर्थ नाही.

समर्थ रामदास स्वामी गावोगावी संचार करीत असताना त्यांना एक दांपत्य भेटले आणि त्यांनी आपला मुलगा समर्थांच्या चरणी वाहिला. या मुलाचे नाव होते मधुकर.

एके दिवशी हिंडता हिंडता समर्थ व मधुकर एका खेडेगावात आले. त्या गावात कुणाचीच ओळख नव्हती. शेवटी त्यांनी मारुतीरायाचे मंदिर गाठले. राहण्यासाठी जागा साफसूफ करून घेतली आणि समर्थ आपल्या आसनावर बसले. दुपारची वेळ झालेली होती. तेव्हा समर्थांनी मधुकराला त्या गावातून माधुकरी मागून आणावयास सांगितले. मधुकराने लगेचच झोळी घेतली व तो माधुकरीसाठी गेला. गावाच्या चावडीजवळून जात असताना मधुकराला त्या गावातील चावडीबहाद्दरांनी पाहिले आणि जवळ बोलावून तू कोण? कोठून आलास? वगैरे प्रश्न विचारले. मधुकराने त्या प्रश्नांची उत्तरे धिटाईने दिली. एवढ्यात एक गृहस्थ म्हणाले, "मधुकरा, तुला आम्ही माधुकरी घातली असती, पण तू फारच उशिरा आलास बघ. आम्हा सर्वांची जेवणे झाली आहेत." तेव्हा दुसऱ्या एका गृहस्थाने सांगितले की मधुकरा, आमच्या गावात उशिरात उशिरा जेवणारे एकच गृहस्थ आहेत आणि ते म्हणजे आमचे जोशीबुवा. मोठे धनिक आणि उदार आहेत. तिथे तू गेलास तर तुला दहा घरची भिक्षा एकाच घरी मिळेल. तेव्हा तू तिथे जा.

हे ऐकून मधुकराला अत्यंत आनंद झाला. आधीच बरेच अंतर चालून आल्यामुळे त्याचे पाय दुखायला लागले होते. तेव्हा आता माधुकरीला दुसरीकडे हिंडत बसायला नको, असा विचार करून मधुकराने जोशीबुवांचे घर गाठले. अंगणात उभे राहून त्याने "समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे। जयाची लीला वर्णिती लोक तिन्ही। नुपेक्षी कदा रामदासाभिमानी॥" हा श्लोक म्हणून 'जय जय रघुवीर समर्थ' अशी गर्जना केली. जोशीबुवा बाहेर आले. त्यांनी त्या मुलाकडे एकवार नजर टाकली आणि काय उर्मट मुलगा आहे हो हा! असे पुटपुटत मधुकराजवळ येऊन त्यांनी त्याला विचारले, "मुला, तू फार शहाणा दिसतोस. तू आत्ता कुठला श्लोक म्हणालास?" मधुकराला त्यांच्या बोलण्यातली खोच समजली नाही. त्याने तो श्लोक पुन्हा म्हणून दाखविला. शास्त्रीबुवा म्हणाले, "मुला, तुला या श्लोकाचा अर्थ तरी समजतो का?" मधुकराने उत्तर दिले, "महाराज, यात अर्थ न समजण्यासारखे काहीच नाही. अगदी सरळ अर्थ आहे. समर्थांच्या सेवकांकडे वाकड्या दृष्टीने पाहण्याची या सर्व भूमंडळाच्या ठिकाणी कुणाचीही प्राज्ञा नाही आणि ज्याच्या लीलांचे वर्णन अखिल त्रैलोक्य करते, तो माझा राम दासाबद्दल अभिमान धारण करणारा असून दासाची कधीच उपेक्षा करीत नाही." जोशीबुवांचा पारा चढला. "आपल्या सेवकाकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कुणाचीही प्राज्ञा नाही, अशी घमेंड मारणारा कोण आहे, हे मला एकदा पाहिलेच पाहिजे! पण थांब जरा, आत ये!" असे म्हणून जोशीबुवांनी मधुकराला ओसरीवर नेले. त्याची जन्मवेळ टिपून घेतली, पत्रिका तयार केली आणि त्यांनी त्याला सांगितले, "मुला, उद्या – माध्यान्हीला तुझा मृत्यू आहे. उद्या तू मरणार आहेस. तेव्हा मृत्यूच्या तावडीतून जर तुझ्या समर्थाने तुला सोडविले तर परवाच्या दिवशी तू माधुकरीला ये. मी माधुकरी घालीन."

हे ऐकल्याबरोबर आधीच थकलेला मधुकर गलीतगात्र झाला. त्याचे पाय लटपटू लागले. त्याने कशीबशी दोन-चार घरे हिंडून माधुकरी आणली आणि समर्थांपुढे ठेवली.

समर्थांनी मधुकराला जवळ बोलाविले आणि म्हणाले, "मधुकरा, फारच थकलेला दिसत आहेस, बैस." असे म्हणून त्याच्या पाठीवरून हात फिरविल्याबरोबर मधुकर ओक्साबोक्शी रडू लागला. समर्थ म्हणाले, "मधुकरा, तुला काय झाले ते सांग तरी? तुला कोणी मारले का? कुणी बोलले का?"

मधुकर म्हणाला, "महाराज, मारले असते तरी पत्करले असते, पण मला माझ्या मरणाची भीती वाटत आहे. आज जोशीबुवांनी माझे भविष्य वर्तविले आणि उद्या दुपारी माध्यान्हीला तू नक्की मरणार आहेस, असे सांगितल्यापासून माझ्या मनाला धसका बसला आहे. महाराज, मरणापूर्वी आईबाप तरी भेटावेत, अशी माझी इच्छा आहे. पण ते कसे जमणार? आमच्या गावचा प्रवास म्हणजे चार दिवस तरी लागणार! आता काय करू? महाराज, पहा मला थंडी वाजू लागली आहे. अंग कढत झाल्यासारखे वाटत आहे." समर्थांनी मधुकराच्या अंगाला हात लावला तेव्हा त्यांना चटकाच बसला. समर्थांनी मधुकराची शय्या घातली. मधुकराला त्या शय्येवर झोपवले आणि ज्यांच्या चरणरजाने अखिल पृथ्वी पुनीत व्हावी अशा समर्थांनी मधुकराचे पाय चेपायला सुरुवात केली. मधुकराचा ताप वाढत होता. थोड्याच वेळात मधुकराचा मनावरचा ताबा उडू लागला. तो बेशुद्ध झाला आणि त्यातच त्याची बडबड सुरू झाली. आई... बाबा... तुम्ही मला कसे हो भेटणार? मी जाणार... मी देवाघरी जाणार... मला बोलावणे आले आहे... आई, तू का रडतेस? बाबा, तुम्ही का रडता? माझ्या समर्थांनी नाही मला मारले... ते फार चांगले आहेत... आई, तू इथे नाहीस म्हणून त्यांनीच माझे अंथरूण घातले... त्यांनीच माझे पाय चेपले... आई, त्यांना तू बोलू नको... ते पहा... ते पहा यमाचे दूत आले... नाही... मी येणार नाही... असे म्हणत तो दचकून उठत असे. डोळे उघडून पाही. तो समर्थांची प्रेममयी मूर्ती समोर दिसे. सर्व रात्र निघून गेली. शनिवार उजाडला. समर्थांनी पाणी तापविले आणि समर्थ त्याला म्हणाले, "मधुकर, आज शनिवार आहे. आज स्नान करायला पाहिजे." मधुकर म्हणाला, "महाराज, माझ्या अंगात बसायचीसुद्धा ताकद नाही, स्नान कसे करू? आणि त्यातून आज मी जाणार! मरणार!"

समर्थ म्हणाले, "मरायचं आहे तर पारोशाने कशाला मरतोस? आंघोळ करून तरी मर! तुझ्या अंगात शक्ती नाही, तर मी तुला मांडीवर घेऊन स्नान घालतो, मग तर झाले!" असे म्हणून समर्थांनी मधुकराला उचलून एका सपाट धोंड्यावर बसविले, तेव्हा त्याचे सर्व शरीर लटपटत आहे, असे पाहून त्यांनी मधुकराला आपल्या मांडीवर बसविले आणि स्नान घालायला सुरूवात केली. ज्या समर्थांच्या चरणाच्या तीर्थाने अखिल ब्रह्मांडाची दुःखे दूर होतात, त्या समर्थांनी मधुकराच्या अंगावरून पडणारे तीर्थ आपल्या अंगावर घेतले. ही खरी शिष्यप्रीति! उभयतांच्या आंघोळी झाल्यानंतर समर्थांनी खिचडी तयार केली आणि मधुकराला जेवायला बोलाविले. तो म्हणाला, "महाराज, मला मरायला आता घटका-दोन-घटकांचाच अवधि राहिलेला आहे. आता जेवायचे तरी कशाला?" समर्थ म्हणाले, "मरायचे तर आहेच, मग उपाशी पोटाने कशाला मरतोस? भरपूर खा आणि मग मर!" मधुकर अंथरूणावर बसला आणि त्याने दोन घास खाल्ले. समर्थांचे भोजन झाले. येथपर्यंत माध्यान्हीचा सुमार झाला. समर्थ मधुकराजवळ आले आणि मधुकराला म्हणाले, "मधुकरा, काल रात्री तुझ्या बडबडण्यामुळे मला झोपच आली नाही. तेव्हा आता मी जरा पडतो."

मधुकर म्हणाला, "महाराज, आता एकदा माझा देह पडला म्हणजे मग पडा." समर्थ म्हणाले, "ते काही नाही.

मी थोडा वेळ झोप घेणार आहे. तू जरा माझे पाय चेपीत बैस आणि कुणीही तुला बोलाविले तरी माझ्या अंगावरची घोंगडी सोडून जाऊ नकोस.'' असे सांगून समर्थ घोरू लागले. मधुकर पाय चेपीत होता. एवढ्यात आठ-दहा काळेभिन्न पुरुष दरवाजापाशी आले. त्यांनी मधुकराला बाहेर बोलाविले. मधुकर म्हणाला, ''मी माझ्या गुरुमाऊलीची सेवा करीत आहे. मी उठणार नाही.'' दूत खवळले आणि त्याला म्हणाले, ''बऱ्या बोलाने आलास तर ठीक आहे. नाही तर खेचून आणू!''

एवढे ऐकून मधुकर म्हणाला, ''इतक्या दमदाटीने काम होणार नाही. असा दम द्यायला तुम्ही कोण एवढे लागून गेला आहात?'' दूत म्हणाले, ''आमचा प्रताप तुला माहीत नाही असे दिसते. आम्ही यमाचे दूत आहोत. आमची आज्ञा आहे, ताबडतोब बाहेर ये.'' मधुकराला समर्थांचा आधार होता. त्याने ताडकन् उत्तर दिले, ''तुम्ही काय वाट्टेल ते करा. मी बाहेर येणार नाही. तुम्हीच काय पण तुमचा मालक साक्षात् यम जरी इथे आला तरीसुद्धा मी जागचा हलणार नाही.'' हे ऐकून दूतांनी पाश टाकले. पण आश्चर्य असे की दूतांचे पाश जेमतेम घोंगडीपर्यंत येत असत आणि तेथूनच परत फिरत. शेवटी यमदूत आपापसात म्हणाले की या विष्णूभक्ताला येथून न्यावयाचे काम महाकठीण आहे. या मुलापुढे आपले सामर्थ्य काही चालत नाही. तेव्हा हे वृत्त स्वतः यमराजांनाच सांगावे, असे म्हणून यमदूत निघून गेले. मधुकराला वाटले, बहुतेक या घोंगडीत काहीतरी जादू भरली आहे. म्हणून त्याने बहुतेक सर्व घोंगडी आपल्याभोवती लपेटून घेतली आणि थोडेसे टोक समर्थांच्या अंगावर ठेवले. काही वेळाने एक भव्य आकृती दाराजवळ दिसली. बरोबर रेडा आहे, हातात पाश आहेत, अशा थाटात यमाची स्वारी दाराशी आली आणि आपल्या करड्या आवाजात त्याने मधुकराला हाक मारली. मधुकराने उत्तर दिले, ''तुम्हाला मी छपन्न वेळा सांगितले की मी येथून हलणार नाही, मी बाहेर येणार नाही तरी तुम्ही मला पुन्हा पुन्हा बाहेर यायला सांगता! तुम्हाला काहीच कसे वाटत नाही.'' यम म्हणाला, ''पोरा, नीट विचार करून बोल. मघाशी आले होते ते माझे दूत होते. आता मी प्रत्यक्ष यम तुझ्यासमोर आलो आहे. मुकाट्याने बाहेर ये.'' मधुकर म्हणाला, ''प्रथम दूतांकडून काम होईना म्हणून जरी तुम्ही इथे आला असलात तरी लक्षात ठेवा, तुम्हीच नव्हे, तर साक्षात् तुमचा बाप जरी मला बाहेर बोलावू लागला तरी मी बाहेर येणार नाही.'' हे उत्तर ऐकून यम संतापला. त्याने आपले पाश टाकले, पण पूर्वीप्रमाणेच पाश घोंगडीपर्यंत येऊन पुन्हा परत गेले. पाशांचे सामर्थ्य चालत नाही आणि आपल्याला स्वतःला आत जाऊन मधुकराचे प्राण घेता येत नाहीत, असे पाहून हातपाय आपटीत यम निघून गेला. थोड्या वेळाने समर्थ उठले आणि त्यांनी मधुकराला विचारले, ''काय मधुकरा! तू अजुनी इथेच आहेस! मला काही भलतेच वाटले!'' मधुकराने सर्व हकीकत निवेदन केली आणि तो म्हणाला, ''महाराज, या घोंगडीने आज मला वाचविले आहे.''

समर्थ म्हणाले, ''काही हरकत नाही. आता उद्या ज्या जोशीबुवांनी तुझा मरणकाळ तुला सांगितला होता त्यांच्या घरी जाऊन माधुकरी आण.'' मधुकर म्हणाला, ''मी जाईन, पण वाटेत पुन्हा यमदूत उपटले, तर काय करू?'' समर्थ म्हणाले, ''अरे, तुझ्या मरणाची वेळ आता टळली आहे. आता का काळजी करतोस?'' मधुकर म्हणाला, ''मी जातो, पण तेवढी घोंगडी मजजवळ द्या.'' दुसऱ्या दिवशी समर्थांनी मधुकराच्या समाधानासाठी त्याला घोंगडी दिली आणि मधुकर जोशीबुवांच्या घरी माधुकरी मागायला गेला. पुन्हा पूर्वीचा श्लोक ऐकल्याबरोबर जोशीबुवा बाहेर आले आणि म्हणाले, ''काय रे, तू अजून इथेच आहेस वाटते?'' मधुकर म्हणाला, ''होय महाराज, आपल्या आशीर्वादिकरून मी अद्याप इथेच आहे.'' जोशीबुवांनी पुन्हा गणित मांडले. याचा मरणकाळ अगदी बिनचूक होता. मग असे कसे घडले? तेव्हा मधुकराने सर्व हकीकत सांगितल्यावर जोशीबुवा म्हणाले, ''एकूण तुझा समर्थ बराच बलवान दिसतो हं! एकदा दर्शनाला आलेच पाहिजे.'' मधुकर म्हणाला, ''एकदा का, आत्ताच चला की!'' असे म्हणून त्याने जोशीबुवांना मारुतीच्या देवळात आणले. मधुकर म्हणाला, ''महाराज, बरं का, ज्यांनी मला माझी मरणाची घटका बरोबर सांगितली, ते हे शास्त्रीबुवा आपल्या दर्शनाला आले आहेत.'' शास्त्रीबुवांनी समर्थांना नमस्कार केला. समर्थ म्हणाले, ''या शास्त्रीबुवा, बसा. काय उद्योगधंदा चालू आहे?'' जोशीबुवा म्हणाले, ''महाराज, ज्योतिष बघणे हा माझा धंदा नाही. आपला आवडीने पाहतो एवढेच.'' समर्थ म्हणाले, ''चांगला आवडीचा धंदा आहे हा! लोकांचे मरणकाळ बघायचे, ते सांगायचे आणि त्यांच्या दुःखावर आपण आनंद मानायचा, हाच ज्योतिषशास्त्राचा हेतू आहे वाटतं? लोकांना आपले आयुष्य किती उरले आहे, हे समजावे, निरवानिरव करायला सवड सापडावी आणि उर्वरित आयुष्य भगवत्सेवेत घालविता यावे, म्हणून योग्य रीतीने भविष्य सांगायचे, हे सोडून जो येईल त्याला त्याचा मरणकाळ आणि तोही अगदी बिनचूक सांगायचा, यासारखा मूर्खपणा नाही. शास्त्रीबुवा, शास्त्राबद्दल आणि तुमच्याबद्दल योग्य आदर ठेवून मी तुम्हाला सांगतो की हे नसते धंदे करण्यापेक्षा तुम्ही केवळ रामनामाचा जप केलात तरी तुम्ही मोठी पदवी मिळवाल, श्रेष्ठ व्हाल.''

समर्थांचे उपदेशपर शब्द ऐकून शास्त्रीबुवांना पश्चात्ताप झाला आणि पुन्हा असे कृत्य करणार नाही, अशी त्यांनी शपथ घेतली. रामरायाचा जयजयकार झाला आणि मधुकराने पुन्हा श्लोक म्हणायला सुरुवात केली... ''समर्थाचिया सेवका वक्र पाहे...''

थोडक्यात सांगायचे तर – सद्‌गुरुमहिमा अगाध व अलौकिक आहे. प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण, प्रभु श्री रामचंद्र व इतर मोठमोठ्या देवांनादेखील सद्‌गुरुंना शरण जावे लागले. मग सामान्य मानवाची काय कथा! यावरून सद्‌गुरुचे माहात्म्य केवढे असामान्य व थोर आहे आणि सद्‌गुरुकृपेची किती निस्सीम आवश्यकता आहे, हे सिद्ध होते.

या जगामध्ये सामान्य गुरु मानवी आयुष्यात शेकडो भेटतात, परंतु 'अ-क्षर' बोध, म्हणजे ब्रह्मबोध करवून देणारा 'सद्‌गुरु' मात्र एकच असू शकतो. तोच केवळ आत्मसाक्षात्काराचा स्वानुभविक मार्ग प्रत्यक्ष दाखवून शिष्याला तात्काळ स्वात्मतुल्य बनवू शकतो.

म्हणूनच आपण सर्व साईभक्तांनी आपल्या सद्‌गुरु साईबाबांनी जो गुरुमंत्र दिला आहे त्याचे सतत मनन, चिंतन, आकलन करून तो प्रत्यक्ष आपल्या जीवनात आचरणात आणण्याचा संकल्प केला पाहिजे. त्यांचा मंत्र म्हणजे – 'श्रद्धा व सबुरी'. आपण कोणतेही कार्य करताना त्यावर श्रद्धा ठेवली पाहिजे, निष्ठा ठेवली पाहिजे व ते कार्य करताना घाई करता कामा नये, धीर धरायला हवा. आपल्याला त्या कार्याचे फळ मिळाल्याशिवाय रहात नाही, पण त्याकरिता आपण सद्‌गुरुच्या ठिकाणी दृढ श्रद्धा ठेवली पाहिजे :

म्हणून ज्ञानेश्वर माऊली म्हणतात –

**"भावेविण देव न कळे नि:संदेह।**
**गुरुविन अनुभव कैसा मिळे॥"**

तर संत तुकाराम महाराज म्हणतात –

**"सद्‌गुरुवांचूनी सांपडेना सोय।**
**धरावे ते पाय आधी आधी॥"**

साईसद्‌गुरुंचे श्रद्धा-भक्तीने व प्रेमभावनेने पूजन-अर्चन करून आपण आपली भक्ती प्रगट करू या आणि आपली श्रद्धारूपी सुमने वाहून स्वाद-मधुर भावभक्तीचा नैवेद्य दाखवून श्रद्धारूपी गुरुदक्षिणा त्यांच्या चरणी अर्पण करू या. साईबाबा आपल्या भक्तांवर कृपाहस्त ठेवण्यास सदैव तत्पर असतातच. ते आपल्या सर्व साईभक्तजनांवर चिरंतन कृपाहस्त ठेवून सर्वांना कृतार्थ करतीलच यामध्ये तिळमात्र संशय नाही.

**नामस्मरण ज्याच्यामुखीं**
**साईकृपे तोच एक सुखी।**
**एकच देव, एकच गुरु, एकच साधन**
**यांवर ठेवता विश्वास**
**कृपा करील साईश्वर खास॥**

## श्री साईभक्तांना नम्र आवाहन

श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाच्या वतीने विविध विकास योजना हाती घेण्यात आलेल्या आहेत. ह्या योजनांसाठी विशेष स्वरुपाच्या देणग्या स्वीकारण्यात येत आहेत. यासंबंधीची माहिती पुढीलप्रमाणे :

'साईबाबा भक्तनिवासस्थान' या इमारतीचे बांधकाम जोरात चालू असून रु. ५०,००० अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव या इमारतीतील एका खोलीला देण्यात येईल. रु. २,००,००० अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव या इमारतीतील जनरल हॉलला देण्यात येईल. ह्या देणगीदारांना वर्षातून दोनदा आगाऊ एक महिना कळविल्यास तीन दिवस रहाण्यासाठी विनामूल्य जागा देण्यात येईल.

मंदिर-नूतनीकरणासाठी रु. १,००,००० अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव बोर्डावर लिहिण्यात येईल.

रुग्णालय-विस्तारीकरणासाठी रु. ५,००,००० अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव एका वॉर्डला अगर ऑपरेशन थिएटरला देण्यात येईल. रु. २०,००० देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव एका बेडला देण्यात येईल. रु. १०,००० अगर त्याहून अधिक देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव बोर्डावर लिहिण्यात येईल.

---

(पृष्ठ क्र. ६ वरुन)

**षट्शास्त्रचातुर्यता। एक विश्वास असावा पुरता। कर्ता हर्ता गुरु ऐसा॥७४॥ म्हणूनि गुरूची थोर महती। गुरु हरिहरब्रह्ममूर्ति। जो कोण जाणे तयाची गति। तो एक त्रिजगतीं धन्य गा"॥**

– अध्याय १९, श्री साईसत्‌चरित

बाबा असेही म्हणत असत की "....**मी कानात फुंकणारा गुरु नव्हे. मी कानाला डसणारा गुरु नव्हे. आमचे घराणे निराळे आहे....**" म्हणजेच बाबांना येथे असे सुचवायचे आहे की "....गुरु हा केवळ उपदेश करणारा असू नये, तर त्याने आपल्या शिष्याची हरतऱ्हेने काळजी वाहिली पाहिजे, त्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, आपण दिलेल्या शिकवणुकीचे तो पालन करीत आहे की नाही हे पाहिले पाहिजे, त्याचे कर्म स्वत:वर घेऊन त्याला लौकिक क्लेशांमधून मुक्त केले पाहिजे, जन्म-मृत्युच्या फेऱ्यांतून मोक्ष मिळविण्याचा मार्ग दाखविला पाहिजे...." बाबांनी अशीच कृपादृष्टी आपल्या असंख्य भक्तांवर ठेवली आहे. याची प्रचिती बाबा मनुष्यदेहात असताना अनेक भक्तांना आलेली आपण श्री साईसत्‌चरितात वाचतो. परंतु त्यासाठी आवश्यक आहे विचार, आचार आणि समर्पित बुद्धीने बाबांनी दिलेल्या शिकवणुकीचे प्रत्यक्ष व सतत पालन करणे.

# सद्गुरु साई–अमूर्त गुरुसंकल्पना

–श्री. के. ह. पटवर्धन
मंगळवेढे, सोलापूर.

गुरुर् ब्रह्मा गुरुर् विष्णु गुरुर्देवो महेश्वरा
गुरु साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः

श्री गुरुंच्या मोठेपणाविषयीचे सार वरील श्लोकात पूर्णपणे आले आहे. त्यामुळेच ज्यांना परमेश्वरभक्ती करावयाची आहे अगर परमेश्वराचे चिंतन करावयाचे आहे त्यांना मार्गदर्शनासाठी श्री गुरुंची आवश्यकता अपरिहार्य आहे.

ज्याप्रमाणे लहान मुलाला रस्त्यावरून जाताना कोणत्याही प्रकारचा अपघात टाळावयाचा असेल तर मोठ्या माणसाचे बोट धरून जावे लागते, त्याचप्रमाणे परमार्थचिंतनासाठी ज्ञानी माणसाची, म्हणजे श्री गुरुंची आवश्यकता असते. म्हणूनच श्री गुरुंच्याविषयी ''श्री सद्गुरुवाचुनी सापडेना सोय''–असे म्हटले जाते.

श्री संत ज्ञानदेव अगर श्री संत तुकाराम महाराज यांनी परमेश्वरचिंतनातून त्यांना स्फुरलेल्या ओव्या, श्लोक, अभंग निर्माण केले. श्री साईबाबांनी अशाप्रकारचे कोणतेही साहित्य निर्माण केले नाही. तथापि, त्यांच्या कृतीमधून, वागण्या, बोलण्या, चालण्यातून त्यांनी समाजाला सहज समजतील व आचरणात आणता येतील, असे उपदेशाचे धडे दिले आहेत. त्यांचे सार काढल्यास तो श्रीगुरुउपदेश जाणून घेता येतो. सर्वसामान्यतः कोणत्याही संत-महात्म्याकडे येणारे भक्त हे ईश्वराच्या ओढीपेक्षा, परलोकी मोक्षप्राप्ती व्हावी ही इच्छा धारण करण्यापेक्षा, ऐहिक सुखसमृद्धी भोगावयास मिळावी, अशा यदृच्छेनेच येत असतात. अर्थात, अशाप्रकारची मनोवृत्ती असणे हा मानवाचाच स्थायीभाव, मनोधर्म आहे. मग कोणी सहकुटुंब, सहपरिवार श्री सत्यनारायणाची पूजा करणारी व्यक्ती असो, अगर ऊन, पाऊस, थंडी, वारा यांचा त्रास आणि शारीरिक कष्ट सोसून पांडुरंगाच्या दर्शनास जाणारा पंढरीचा वारकरी असो. म्हणूनच संत-महात्मे अशा लोकांना चमत्काराची प्रचिती देऊन भक्तिमार्गाकडे वळवितात.

श्री साईबाबांचा भक्त बनणे, दर्शनार्थी होणे ही केवळ योगायोगाचीच गोष्ट आहे. आजच्या या युगात प्रचिती येणे, श्रद्धा निर्माण होणे यामागे कोणत्याच विभूतीचा आशीर्वाद असल्याचे मानले जात नाही. इतकेच नव्हे तर तो केवळ योगायोग मानला जातो. अर्थात, ऐहिक विज्ञानाच्या पलिकडेही अतर्क्य अशी एक शक्ती असावी असे नित्य अनुभव येतात व नंतर त्यामधूनच त्या निर्गुण निराकार परमेश्वरीशक्तीविषयी श्रद्धा निर्माण होते.

संतांविषयी श्रद्धा निर्माण झाल्यानंतर त्यांना पारखून घेणे विलक्षण विचारसरणीच्या माणसाला आवर्जून आवश्यक वाटते. तथापि, संत दासगणू महाराज श्री साईबाबांना गुरुस्थानी मानत होते. हे समजल्यानंतर दासगणू महाराज यांचा आध्यात्मिक क्षेत्रातील अधिकार ज्यांना माहिती आहे असे लोक साहजिकच फकिरी वेषातील श्री साईबाबांच्यावर श्रद्धा ठेवून त्यांना गुरुस्थानी मानू लागतात.

श्री सद्गुरुबाबत वेगवेगळ्या संत-महंतांनी भिन्न भिन्न मते मांडली आहेत. अर्थात, शब्द वेगवेगळे असले तरी शेवटी त्या सर्वांचे सार एकच आहे. परंतु श्री साईबाबांनी 'सबका मालिक एक' या एकाच वाक्यात ते सार सांगितले आहे. दत्तगुरुंनी चोवीस गुरु मानले होते. अर्थात, प्रत्येक व्यक्ती त्या व्यक्तीस भावणाऱ्या संतास गुरुस्थानी मानणे साहजिक आहे.

एकलव्याने आपणास योग्य वाटणारी व्यक्ती गुरुस्थानी मानली. त्याने प्रत्यक्ष गुरुउपदेश घेणे आदी संकेत आवश्यक मानले नाहीत व आत्मसामर्थ्याच्या बळावर अंतिम ध्येय गाठले. अध्यात्माच्या मार्गात योग्य सद्गुरुअभावी चुकीच्या वाटेने जाण्याचा फार संभव असतो. अशा परिस्थितीत आज हयात नसलेली व्यक्ती गुरुमूर्ती म्हणून डोळ्यांसमोर ठेवून एकलव्याचा आदर्श मानून योग्य ती प्रगती करून घेता येईल व अंतिम ध्येयही गाठता येईल. गुरुमूर्ती मनचक्षुपुढे ठेवून परमेश्वराचे चिंतन केल्यास गुरुत्वाचा आदि, अंत रहाणारच नाही व निरामय अशा अविनाशी, तेजोमय परमेश्वराची संकल्पना अखंड सान्निध्यात राहील.

मर्त्य मानवाला भोगावे लागणारे शरीरभोग गुरु मानलेल्या थोर व्यक्तीसही भोगावे लागलेले पाहून त्यांच्या भक्तांना ते भावतातच असे नाही. कारण ज्या व्यक्तीस आपण दैवीशक्ती मानतो ती व्यक्ती शरीरभोग भोगताना पाहिल्यानंतर सर्वसामान्य माणसाच्या मनावर परिणाम होतो व निर्विकारपणा भंग पावून श्रद्धा कमी होते. त्यामुळेच आज हयात नसलेल्या गुरुमूर्तीवरील श्रद्धा अभंग राहते. ह्या सर्व गोष्टींचा विचार करता एकलव्याची गुरुविषयीची संकल्पना सुजाण वाटते.

श्री साईबाबांना गुरुस्थानी मानल्यानंतर त्यांचे आचार, विचार, उपदेश सर्वसामान्य माणसाला आचरणात आणण्यास सहज-सुलभ आहेत, हे आपोआप ध्यानात येते. बदलत्या काळानुसार सर्वसामान्य माणसाला कोठेतरी जंगलात जावून तपश्चर्या करणे शक्य होणार नाही. म्हणूनच की काय ज्ञानोबा, तुकोबारायांनी भागवत धर्माच्या आचरणात नामसंकल्पनेस महत्त्व दिले आहे.

(पृष्ठ क्र. १५ वर)

# गुरुकृपा

–श्री. यशवंत नार्वेकर
प्रभादेवी, मुंबई.

'गुरुकृपा' या सामासिक शब्दात 'गुरु' हा शब्द मुख्य आहे. म्हणून गुरु कोणाला म्हणावे हे प्रथम समजून घेऊ. श्री रामदास स्वामींनी आपल्या दासबोधातून गुरुनिश्चय आणि गुरुलक्षण असे दोन समास लिहिले आहेत. गुरुनिश्चय या समासात गुरु कशासाठी करायचा असतो, हे सांगितले असून मग गुरु कसा असावा, हे गुरुलक्षण सविस्तर निवेदन केले आहे.

**जंव नाही ज्ञान प्राप्ति। तंव नाही यातायाती।**
**गुरुकृपेवीण अधोगती। गर्भवास चुकेना।**

गुरुकडून मिळणारे ज्ञान हे पापकर्मामुळे होणारी अधोगती तर टाळतेच शिवाय जन्ममृत्युच्या फेऱ्याही चुकवते. प्रथम गुरुच्या शाळेमध्ये आपले नाव घातले पाहिजे. सद्गुरुच्या आज्ञेचे पालन करायला पाहिजे. सद्गुरु आपल्या स्वरुपाची ओळख करून देतात. साईमाऊलींनी आम्हा अज्ञजनांच्या गळी हा सिद्धांत उतरविण्यासाठी अमृताचा मोठा सुरेख दृष्टांत दिला आहे. आपण कर्म करीत असताना ते सिद्धीस जावो वा न जावो, त्याबद्दल हर्ष किंवा विषाद मानावयाचा नाही. ते कर्म मी करतो, ते स्वतःच्या अथवा कुटुंबाच्या कल्याणासाठी करतो, अशी अपेक्षा किंवा आसक्ती ठेवायची नाही, अशा वृत्तीने तू कर्म करीत रहा! सुख-दुःख, मान-अपमान, निंदा-स्तुती वगैरे द्वंद्वात मनाचा तोल ढळू न देता आपल्या जीवनाची दोरी सद्गुरु श्री साईनाथांच्या हाती देऊन तू मोकळा हो! म्हणजे आत्मारामाच्या रथात बसून गंमत पहात रहा! सद्गुरु श्री साईबाबा विविध रुपात नटलेले आहेत व प्रत्यक्ष परब्रह्म निर्गुण असताना भक्तांसाठी साईं सगुणरूप घेऊन शिरडी ग्रामी प्रगट झाले. अज्ञजनांच्या उद्धारासाठी बाबा सत्चरितामध्ये सांगतात, 'सर्वांभुती हरीचा वास, करू नये कुणाचा द्वेष'. सर्व प्राणीमात्रांमध्ये आत्मरुपी ईश्वर भरला आहे. जे जे दिसेल भूत, त्यासी मानी भगवंत. मन गुरुला अर्पण करायचे, कर्तेपणा आपल्यावर घ्यायचा नाही. 'मन माझे दक्षणा, ती मी अर्पितो आपणा, जेणे नुरेल कर्तेपणा'. कारण ऐहिक किंवा पारलौकिक उत्कर्ष-अपकर्ष, म्हणजेच अध्यात्म वाङ्मयाच्या भाषेत बंध किंवा मोक्ष हा त्या मनावरच अवलंबून आहे. मनाला कोणत्याही विषयाची गोडी लागली की ते त्याच विषयाच्या गोडीला लागते व त्यातच नित्य रममाण होते. म्हणून या मनाला श्री साईसद्गुरुंच्या ठाई रोज थोडा वेळ म्हणून का होईना वळवीत जावे, म्हणजेच त्याची चंचलता जाऊन परब्रह्माच्या ठाई ते स्थिर होते. देह हा पंचतत्वाचा बनलेला आहे. त्यात असलेली आत्मरूपी ज्योत एकदा का मावळली की त्याची माती होते. आपण जन्माला आल्यापासून मृत्यू आपली साथ करीत आहे. कधी झडप घालून आपल्या देहाची माती बनवील, याचा नेम नाही. परमेश्वराशिवाय या जगात अमर असे काहीच नाही. म्हणून परमेश्वरज्योतीला भेटण्यासाठी सद्गुरुंनी सांगितलेल्या नामस्मरणाचा जप करीत रहावे आणि स्वतःच आपला उद्धार करून घ्यावा. उद्याचा भरवसा नसूनही मनात मात्र आशा असते की हे धन जमविल्यावर ते माझ्या उपयोगी पडेल, पुढे अमुक मला भोगावयास मिळेल, तमुक प्राप्त होईल, भविष्यात सुखी होईन. परंतु अशा मोठमोठ्या मिथ्या आशांच्या ओघात आपण निरंतर दुःखच भोगतो व इतक्यात मृत्यू येऊन दाखल होतो, म्हणजे झाले सगळेच संपले. खोट्या आशेने ज्या वस्तू प्राप्त व्हायच्या नाहीत, अशा वस्तूंचे चिंतन करणे, हे वासनारूपी कर्माचे ओझे होय! फक्त आत्मा हाच हरी आहे. म्हणूनच साईनामाचे-हरीनामाचेच चिंतन करीत असावे. चिंतनाने सर्व उपाधी नाहीशा होतात. भय, चिंता पळून जातात. मनुष्यदेहाच्या योगाने संतज्ञान प्राप्त करून जीव मोक्ष प्राप्त करू शकतो. हीच गुरुकृपा होय! हे सर्वसंतमुखींचे बोल आहेत.

---

(पृष्ठ क्र. १४ वरून)

तथापि, श्री साईबाबांनी त्याही पुढे जावून निर्गुण निराकार परमेश्वराची सहज-सोपी भक्ती करण्यास सांगितले आहे.

श्री साईबाबांचे मूलतत्त्व 'श्रद्धा व सबुरी' असे आहे. श्रद्धेशिवाय भक्ती नाही व भक्तीनेच ईश्वर अगर मोक्ष मिळविता येतो. पण त्यासाठी चिकाटी आवश्यक आहे. म्हणजेच पर्यायाने सबुरी आवश्यक आहे.

वैज्ञानिक दृष्टीने संशोधन करताना संशोधनाच्या फलिताविषयी श्रद्धा बाळगावी लागते व चिकाटीने परिश्रम केल्यावरच कोणतेही संशोधन साध्य होते. म्हणजेच श्रद्धेबरोबर सबुरीचीही आवश्यकता आहे.

अर्थात, श्री साईबाबांची साधी तत्त्वेही पालन करणे, हीदेखील भक्तांची एक कसोटी असते. त्यांच्याप्रमाणे सर्वसामान्य माणसाला निर्विकल्प मनोधारणेने सर्वांभुती निर्गुण निराकार असा एकच परमात्मा मानणे शक्य होणार नाही. कारण तसे मानून आपण भुकेल्या कुत्र्याला नामदेवाप्रमाणेच पोळीबरोबर तुपाची वाटी देवून आसक्तीचा त्याग करू शकू. एकनाथाप्रमाणे गंगेच्या पाण्याची कावड एखाद्या तहानलेल्या प्राण्याच्या मुखात रिती करून दया-भाव दाखवू शकू. परंतु श्री साईबाबा भिक्षा मागून आणलेले अन्न एखाद्या कुंडीत एकत्र ठेवीत व ते एखाद्या भुकेल्या कुत्र्याने तोंड घालून खाल्ले तरी तेच अन्न निर्गुण निराकार, एकात्म परब्रह्माच्या भावनेने श्री साईबाबा तितक्याच निर्विकारपणाने ग्रहण करीत असत. तसे ते सामान्य भक्तांना शक्य नसते. म्हणूनच अशा वेळी भक्तांची कसोटी लागते.

ह्या सर्व गोष्टींचा साक्षेपाने विचार करता निर्गुण निराकार परंतु गुरुमूर्तीच्या रूपाने दर्शन देणारा व भक्तांना योग्य ते मार्गदर्शन करून अंतिम ध्येयाप्रत नेणारा श्री साईबाबांसारखा सद्गुरु आपणा सर्वांनाच वंदनीय आहे.

# स्मरा नित्य साई सद्गुरुचे नाम

–श्री. वि. म. हटवार
रेशीमबाग, नवापूर.

प्रत्येक जीव शिवाचा अंश आहे. जीवाने शिवाकडे आकृष्ट होणे, शिवमय होणे व शिवात विसर्जित होणे, हे संस्कारमय जीवनाचे उद्दिष्ट आहे. म्हणूनच साईनाथांवर श्रद्धा ठेवून देह-प्रारब्धाचे भोग भोगावे.

श्रेष्ठ संत श्री साईबाबा सर्वांना सांगत –

**'सब पर दया करो. सब के दु:खों का निवारण करके अपने सुख का अनुभव करो. ममता और अहंकार से सदा बचे रहो. मालिक सबका भला करेगा. उसको श्रद्धा से देखो. वही सब का मालिक है. सुख-दु:ख समान भाव से अनुभव करो.'**

श्रीसद्गुरुवर निष्ठायुक्त श्रद्धा असेल तरच कार्यसिद्धी होईल. विश्वास व विवेकबुद्धी असल्याशिवाय कोणताही व्यवहार लाभदायक होत नाही. वैद्यावर विश्वास नसेल तर कितीही किंमती औषधाने रोग बरा होणार नाही.

सर्वश्रेष्ठ ईश्वर सर्वशक्तिमान व सर्वज्ञ आहे. ईश्वराच्या नामस्मरणाने भय नष्ट होऊन आत्मविश्वास वाढतो. ईश्वर अनंतकोटी ब्रह्माण्डाचा रक्षक, सर्वेश्वर, शरण आलेल्या जीवात्म्याचा रक्षणकर्ता आहे.

साईस्वरूपाचे ध्यान केल्याने भक्ताचे मनोरथ पूर्ण होतात. साईरामाच्या भजनात परमानन्द मिळतो. सांसारिक वस्तु व व्यक्तीस समर्पित न होता साईला शरण जावे.

मनुष्यजीवनाच्या प्रगतीचे तीन टप्पे आहेत – सहजप्रवृत्ती, भौतिक समृद्धी आणि मानसिक उन्नती. हा परीघ ज्या महाभागांनी ओलांडला, ते बुद्ध, महावीर, साईनाथ यांनी चालू जन्माबद्दल तर सांगितलेच; परंतु पुढच्या जन्माचेही ते सांगत. आसक्ती, राग, द्वेष त्यागणारे ब्रह्मानंदी तल्लीन होतात. सत्याची शोभा आत्मज्ञानाने किंवा साक्षात्काराने झाली तरी ते सत्य पचविता आले पाहिजे. अध्यात्म हे अंतिम सत्याकडे नेणारे शास्त्र आहे. पूर्णातून पूर्णाचा उदय होऊनही पूर्ण शिल्लकच राहते.

सर्वसामान्य लोक केवळ याच जन्माबद्दल बोलतात; कारण ते वर्तमान आयुष्यातील शारीरिक, मानसिक व बौद्धिक सुखाचा मर्यादित विचार करू शकतात. ऐहिक संपन्नतेकरिता ते धडपड करीत असतात. स्वसुखाकरिता जे कुणावर अवलंबून रहात नाहीत, ते समाधानी असतात. अति-परिश्रम करूनही यशप्राप्ति न झालेले, ज्यांना संसाराच्या कटकटींना कंटाळून वैराग्य आलेले असते, अशा परिस्थितीतही मनावर ताबा ठेवून जे साईभजनाकडे वळतात, ते भक्त होतात.

बालपणापासून जे आध्यात्मिक संस्कार मनावर उमटलेले असतात, ते सन्मार्गाकडे जाण्यास सतत प्रवृत्त करून साईसेवेत गुंतवितात. तेच संस्कार पुढे भक्तिपंथास लावून ज्ञानप्रवीण करतात. संसारातील ममता कमी झाली तरच अंत:समयी कशाचीही आस उरत नाही. मन साईध्यानात रमलेले असते.

**'ध्यान साईचे करता करता, आनंद भरून राहे चित्ती।**
**मना वाटे अतिप्रसन्न, दु:खें सारी दूर जाती।।'**

प्रपंचातूनच परमार्थाकडे जाण्याची श्री साईंची शिकवण आहे. माणूस म्हणून जगण्याचे सौंदर्य कळावे याकरिता संस्कृती आहे. ती विकसित होण्यासाठी अध्यात्मज्ञानाची समाजाला आवश्यकता आहे. श्री क्षेत्र शिरडीत श्री साईरामाने साजरी केलेली रामनवमी ही आत्मिक विजयाची विजयादशमीच होती. यामुळे ह्या दोन्ही उत्सवांना सारखेच महत्त्व प्राप्त झालेले आहे. ज्यांना आत्मज्ञानाची साक्ष पटली त्यांना मनुष्यजन्म यशस्वी झाल्याचे साक्षात्कारी जीवन अनुभवून विजयी मुद्रेने प्राणत्याग करता येतो व त्यामुळेच समाज अशा थोर विभुतींची पुण्यतिथी उत्साहाने साजरी करतो. त्यांच्या जन्मोत्सवास व पुण्यतिथी सोहळ्यास भक्तजनांस आत्मानंदाची सारखी प्रचिती येते. अशा भारावलेल्या निष्ठावान सेवकांचा उद्धार साईनाथ करतात. आध्यात्मिक उद्धारासाठी इच्छाशक्ती व क्रियाशक्ती एक झाली पाहिजे. साईउपदेश भोळ्या जनांचा आवडता विषय होता. श्री बाबा बोलतील, काहीतरी सांगतील म्हणून चावडीवर गावकरी एकत्र होत. परगावाहून आलेले भक्त बाबांची परवानगी मिळाल्याशिवाय शिरडी सोडत नसत. समर्थ जे बोलतात, तेच घडत असते. लोकांना जागृत करण्यासाठी देवदूताचे कार्य साईंनी केले व सर्वांना समतेचा संदेश दिला. श्री साईबाबांचे बोल हाच उपदेश मानून अनेकांनी स्वत:च्या प्रापंचिक यातना दूर केल्या. काहींनी देहत्यागाआदी संन्यास घेऊन साईंच्या सान्निध्यात राहून आत्मोद्धार करवून घेतला व साईचरणी अनंतात विलीन झाले. असे भाग्य फारच थोडयाच भक्तांना लाभले तरी अनेकांना त्यामुळे सद्बुद्धी लाभली व श्री साईदर्शनाची ओढ लागली. श्री साईसत्‌चरित पोथीच्या २५ व्या अध्यायात सांगितलेली अभिवचनें श्री साईराम आजही पूर्ण करीत आहेत.

# शिरडीत श्री गुरुपौर्णिमा उत्सव संपन्न



ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम्।
मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोः कृपा।।
गुरुरादिनादिश्च गुरुः परमदैवतम्।
गुरोः परतरं नास्तितस्मै श्री गुरवे नमः।।

वरील श्लोकात म्हटल्याप्रमाणे शिरडीला दरवर्षी लाखो भक्त श्री साईगुरुच्या चरणी आपली आदरांजली अर्पण करण्यासाठी एकत्र येतात. सर्वश्रेष्ठ सद्गुरु साईनाथांच्या शिरडीत देशातील सर्व प्रांतांतून भिन्न भिन्न जातीचे व भिन्न भिन्न धर्माचे लोक एकत्र येतात. त्याप्रमाणे यंदाही दिनांक २५-७-९१ ते २७-७-९१ ह्या कालावधीत गुरुपौर्णिमेचा उत्सव भव्य प्रमाणात लाखों साईभक्तांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही काकड आरती, पूजा-अर्चा, श्रीसाईसत्‌चरिताचे पारायण, भजन, कीर्तन, आरती, धूपारती, मिरवणूक इत्यादि कार्यक्रमांनी गुरुपौर्णिमेचा उत्सव संपन्न झाला.

भारताच्या कानाकोपऱ्यातून भिन्न भिन्न भाषांचे लोक येथे येतात. आपले जाति-धर्म, भाषा-वर्ण, उच्च-नीच हे भेदभाव विसरून बाबांच्या समोर हात जोडतात. मानवतेचे एक मौल्यवान, आदर्श, उदात्त असे हे दृश्य शिरडीत पाहावयास मिळते.

आंध्रप्रदेशातील चित्तूर प्रांतातील उच्चविद्याविभूषित श्री. एम्. नारायण राजू अनेक वर्षांपासून शिरडीला येतात. ते पुत्तुरच्या शिरडी साईबाबा सेवाश्रमाचे कार्यकारी सभासद आहेत. तेथे साईबाबांची आरती, पूजा होते व साईबाबांच्या विचारांचा, तत्वांचा प्रचारही होतो. भारताच्या दक्षिण भागातील जे साईभक्त शिरडीला येतात त्यांची येण्याची व्यवस्था या सेवाश्रमातून होते. गुजराथमधील अहमदाबादचे बाबुभाई पटेल आपल्या मित्रांबरोबर शिरडीला आले होते. ते शिरडीतील वातावरण पाहून प्रभावित झाले होते. ते म्हणाले, "साईबाबा साक्षात् विश्वाच्या महान शक्तीचे प्रतिक आहे. बाबांची ही मूर्ती पहात रहा आणि मनःशांतीचा अनुभव घ्या. शिरडीहून परत आपल्या गांवी जाताना फार वाईट वाटते." शिख साईभक्त राजींदर बेदी धुळ्याहून सपत्निक आले होते. बाबांच्या तसबिरीसमोर बसल्यावर त्यांच्या पत्नीच्या मनाला शांती लाभते. कोपरगावच्या अभियांत्रिकी विद्यालयात शिकणाऱ्या कुमार शर्माचा अनुभव आणखी वेगळाच आहे. तो म्हणाला, त्याचे पूर्ण कुटुंबच साईभक्त आहे. हे कुटुंब काश्मिरचे असून हा मुलगा कोपरगावच्या कॉलेजात शिकतो. दर रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी बाबांच्या दर्शनाला येतो. अशाप्रकारे भारताच्या कानाकोपऱ्यातून लोक येतात. गुरुपौर्णिमा उत्सवाच्या प्रथम दिवशी गुरुवारी नेहमीप्रमाणे काकड आरती झाल्यानंतर समाधीमंदिरातून श्रींचा फोटो व पोथी यांची मिरवणूक निघाली. या मिरवणुकीत संस्थानचे मा. विश्वस्त सर्वश्री डॉ. इ. बी. गोंदकर, के. बी. देवकर, बी. व्ही. खांबेकर, एस्. एम्. धोर्डे यांनी भाग घेतला. ही मिरवणूक वाद्याच्या गजरात गुरुस्थानमार्गे द्वारकामाईमध्ये आली. त्याठिकाणी श्री साईसत्‌चरिताच्या अध्याय-वाचनास सुरुवात झाली. पारायणासाठी माननीय विश्वस्तांकरिता पहिले पाच अध्याय राखीव ठेवून बाकीचे अध्याय सोडत-पद्धतीने भक्तांना वाचनासाठी देण्यात आले.

दुपारी ४-३० ते ६-४५ पर्यंत ह.भ.प. श्री. व्यासबुवा महाराज डोंबिवलीकर यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. त्यांनी 'नामदेवाचा विवाह' या विषयावर अतिशय सुंदर कीर्तन केले. सुप्रसिद्ध कलाकार श्री. राजू बात्रा यांचा गायन-ऑर्केस्ट्रा शांतीनिवास जवळील स्टेजवर पार पडला. रात्री ९-१५ वाजता 'श्रीं'ची पालखी वाद्याच्या गजरात निघाली. त्यावेळेस खूपच गर्दी झाली होती. पालखी गुरुस्थानजवळ आल्यानंतर पालखीसमोर माननीय विश्वस्त श्री. नरोडेबाबा, श्री. एकनाथ कोते, श्री. रघुनाथ सांडभोर, श्री. तुकारामबुवा परदेशी यांनी भारुडाचा कार्यक्रम सादर केला.

मुख्य दिवस शुक्रवारी होता. त्या दिवशी पहाटेपासूनच मंदिराच्या समोरील शेडमध्ये भक्तांची गर्दी झाली होती. नेहमीच्या कार्यक्रमांव्यतिरिक्त सकाळी काकड आरती झाल्यावर ५-४५ वाजता श्रींच्या फोटोची व श्री साईसत्चरित-ग्रंथवाचन-समाप्तीची मिरवणूक द्वारकामाईतून गुरुस्थानमार्गे समाधीमंदिरात आली.

दुपारी ४-३० वाजता व्यासबुवा डोंबिवलीकर यांचे कीर्तन झाले. रात्रौ ९-१५ वाजता 'श्रीं'च्या रथाची मिरवणूक निघाली. गुरुस्थानजवळ आल्यावर रथासमोर भारुडाचा कार्यक्रम झाला.

शनिवार, दिनांक २७-७-९१ हा उत्सवाचा शेवटचा दिवस होता. या दिवशी सकाळी गुरुस्थानमध्ये रुद्राभिषेक करण्यात आला. सदर पूजेकरिता मा. विश्वस्त श्री. पृथ्वीराज आदिक बसले होते. १०-३० वाजता ह.भ.प. श्री. व्यासबुवा यांचे गोपाळकाला व कीर्तन हे कार्यक्रम झाले. श्रीकृष्णांच्या लीलांवर आधारित असे हे कीर्तन फारच सुंदर झाले. दुपारी ४-३० वाजता 'रंग-तरंग' हा कार्यक्रम नटराज थिएटर्सने सादर केला. हा कार्यक्रम महाराष्ट्राची संस्कृती, पद्धती इत्यादींवर आधारित होता. ७-३० वाजता प्रसिद्ध गायक श्री. मनहर उधास यांचा भक्तिगीते, साईगीते, त्याचप्रमाणे भजनांचा श्रवणीय कार्यक्रम झाला. त्यावेळी संस्थानच्या माननीय अध्यक्षा प्रो. डॉ. लेखा पाठक यांच्या हस्ते 'साई-संसार' या भक्तिगीतांच्या कॅसेटचे प्रकाशन झाले. यातील भजने संगीत-दिग्दर्शक पं. के. राझदान यांनी लिहिली असून मनहर उधास यांनी गाईली आहेत. या संदर्भात येथे विशेष उल्लेख ..रावासा वाटतो तो मनहर उधास यांनी दिनांक १४ ऑगस्ट १९९१ रोजी मुंबई येथे तेजपाल हॉलमध्ये (गोवालिया टँक) सादर केलेल्या 'साई-भजन रजनी'चा. अशाप्रकारचा साई-भजनाचा कार्यक्रम मुंबईत प्रथमच सादर करण्यात आला, हे या कार्यक्रमाचे नावीन्य होते.

गुरुपौर्णिमेच्या उत्सवाला हजारोंच्या संख्येने लोक उपस्थित होते. साईभक्तांचा हा भव्य मेळा तीन दिवस अतिशय आनंदपूर्ण, पवित्रमय, मंगलमय वातावरणात साजरा झाला. भारताचे मा. पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांची कन्या सौ. शारदा, पंतप्रधानांचे जावई श्री. एन्. व्यंकट किशनराव व अन्य नातेवाईक मंडळी या उत्सवात सहभागी झाली होती. तसेच मा. खासदार शंकररावजी काळे, मा. आमदार अण्णासाहेब म्हस्के इत्यादींनीसुद्धा उत्सवकाळात भेटी दिल्या.

अशाप्रकारे तीन दिवसांचा हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला.



गुरुपौर्णिमा उत्सवप्रसंगी समाधीमंदिरात पूजा करीत असताना घेतलेल्या छायाचित्रात डावीकडून मा. पंतप्रधान श्री. नरसिंहराव यांचे जावई श्री. एन्. व्यंकट किशनराव, मा. पंतप्रधान यांची कन्या सौ. शारदा, संस्थानच्या मा. अध्यक्षा प्रो. डॉ. लेखा पाठक व त्यांच्या मातोश्री दिसत आहेत.



गुरुपौर्णिमा उत्सवाच्या वेळी प्रसिद्ध गायक मनहर उधास यांच्या भक्तिगीतांचा सुमधुर कार्यक्रम पार पडला. त्यावेळी "साईसंसार" या त्यांच्या नवीन भक्तिगीतांच्या कॅसेटचे प्रकाशन झाले. त्याप्रसंगीच्या छायाचित्रात डावीकडून श्री. मनहर उधास, संगीत दिग्दर्शक श्री. के. राझदान, संस्थानच्या मा. अध्यक्षा प्रो. डॉ. लेखा पाठक, मा. खासदार श्री. शंकररावजी काळे, मा. आमदार श्री. अण्णासाहेब म्हस्के दिसत आहेत.

## तू बा साईनाथा

हृदयमंदिरी बैसलासी, तू बा साईनाथा
भक्तिभावे टेकविला, तव चरणी माथा

मनाच्या गाभाऱ्यात, घुमे सदा नाम
प्रगटे निनाद, तूच राम अन् रहिम

कृपाप्रसादाचा वरदहस्त, साई सर्वां मिळावा
नश्वर मानवीदेहाला, नवअर्थ प्राप्त व्हावा

जीवनाचे साफल्य, श्रद्धा-सबुरीत दडले
अक्षर सुमनांनी, साई तुला साकारले

–कु. सूर्यकांत यादव
मुलुंड (पूर्व), मुंबई.

## साई सर्वांचा आधार

श्रद्धा ठेवा सबुरी ठेवा।
दुःखी जीवनी "साई" हवा॥१॥

करू नका कुणाचा हेवा।
अंगी समाधान ठेवा॥२॥

आत्मा हाच परमात्मा।
हेच सांगे "साई" महात्मा॥३॥

शुद्ध भक्तीचा करू निर्धार।
होई "साई" सर्वांचा आधार॥४॥

–श्री. दत्ता मोहोळे
नवापूर, धुळे.

# माझ्या जीवनातील परमोच्च आनंदाचा क्षण, अर्थात्‌–अमृतवर्षा

(एक सत्यकथन)

–श्री. सदाशिव कीर्तने
अहमदाबाद, गुजराथ.

गेली अनेक वर्षे मी विचार करतोय की जे काही कथन मला तुम्हा सर्वांसमोर करायचे आहे ते करावे किंवा नाही. लोकांना पैसा हवा, त्याचा उपाय या कथनात आहे? लोकांना आधिभौतिक सुख हवे, ते या कथनाने मिळेल? लोकांना नावलौकिक हवा, तो मिळेल? लोकांना मोठी मानाची, अधिकाराची जागा हवी, ती मिळेल? या कथानकाला व्यावहारिक महत्व आहे? याला माझ्याजवळ उत्तर नाही. माझ्या परात्पर गुरुंनी (जगद्‌गुरु ज्ञानेश्वरी माऊली) मला अशातऱ्हेचे काहीही आश्वासन दिलेले नाही. मग मी हे का सांगावयास बसलो? याचे कारण असे–

आज चव्वेचाळीस वर्षे झाली. माझ्या आयुष्यात खूप चढ-उतार आले. पण मला बावीसाव्या वर्षी जे स्वप्न पडले, ते अजूनही मी यत्किंचितही विसरू शकत नाही. उलट त्या स्वप्नाची आठवण दिवसेंदिवस सतत होवू लागलीय. ते स्वप्न नव्हते, तो एक महान दृष्टान्त होता. एकदाच झाला असे नव्हे, दोनदा झाला. आपल्याला रोज अनेक स्वप्ने पडतात आणि दुसऱ्याच दिवशी आपण विसरूनही जातो. काही तर आपल्याला आठवतच नाहीत. तसे या दृष्टान्ताचे नव्हे. जेव्हा जेव्हा हे स्वप्न मला आठवते, तेव्हा तेव्हा मला किती मानसिक आनंद होतो, हे मी कसे सांगू! असे वाटते, हा परमानंद मी सर्वांना का वाटू नये! हा परमानंद मला कसा प्राप्त झाला, हे तुम्हास कळावे, म्हणूनच हा सारा खटाटोप.

**माझी पूर्वपिठिका–**

माझा जन्म नागपूरचा. परंतु माझे बालपण पुण्याशेजारी असलेल्या मुंढवे गावी गेले. आमची वडिलोपार्जित मोठी इस्टेट. प्रशस्त जमीन, टुमदार बंगला व अतिशय रमणीय अशी बाग. 'कीर्तने बाग' म्हणून प्रसिद्ध. वडिलांना गावात खूप मान. माझे वडील जात-पात, उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य असे काही मानत नव्हते. सर्व धर्मांतील लोकांबद्दल त्यांना आदर असे. त्यामुळे आमच्या घरात सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांचे खूप येणे जाणे असे. आमचे वडील व मी सर्व जाती-धर्मांच्या लोकांबरोबर जेवलो, त्यांच्या सणाला व समारंभालाही हजर राहिलो. आमच्या घरात देवाला शिवायला, नमस्कार करायला व पूजा करायला सर्व लोकांना परवानगी असे. गावात खूप हरिजन, मुसलमान होते. तेही येत व देवाला नमस्कार करून जात. आमच्या घरी ख्रिश्चन व पारशीही येत. वडील सर्वांना सारखेच वागवित असत. गावातील लोकांना विहिरीवरून पाणी आणावे लागत असे. आमच्या बंगल्यात विहिरी तर होत्याच, परंतु वडिलांनी पाण्याचे नळ बसविल्यामुळे घरात चोवीस तास जोराने पाणी यायचे. एकदा काय झाले, दुष्काळ पडला. माळी, मराठा, हरिजन ह्या वस्तीतल्या विहिरी आटल्या. प्यायला पाणी नाही. तेव्हा गावातील प्रतिष्ठित मंडळी माझ्या वडिलांना भेटली व त्यांनी पाण्यासाठी विनंती केली. वडिलांनी आनंदाने परवानगी दिली. माझे वडील म्हणाले, "अरे, हे घर तुम्हा सर्वांचे. पाणी तुम्हा सर्वांचे. हवे तितके पाणी घ्या. तुम्ही सर्व रांगेत उभे राहून पाणी घ्या. परंतु रांगेत जाति-पातीवरून भांडू नका. माझे घर तुम्हा सर्वांना अहोरात्र उघडे आहे." सर्वांना फार आनंद झाला. मग काय, दुसऱ्या दिवसापासून बंगल्यासमोर पाण्यासाठी मोठी रांगच रांग. लोकांनी शांततेने आणि शिस्तीने पाणी नेले.

काही दिवसांनी दौंड-मनमाड ही रेल्वे-लाईन घालण्यासाठी एक युरोपियन इंजिनियर आला. त्याचे नाव होते–फ्लॉवरसाहेब. आमचा बंगला रेल्वे-लाईनला लागूनच. त्यामुळे त्याचे लँडिस तेथेच थांबायचे व तो उतरायचा. जेव्हा तो आला तेव्हा त्याने बंगला पाहिला, पण राहण्याबद्दल त्याने माझ्या वडिलांना काहीही विचारले नाही. आमच्या जमिनीमध्ये थोड्या दूरवर असलेल्या आंब्याच्या झाडाखाली एक छोटा तंबू (टेन्ट) उभा करून तेथे तो राहू लागला. सगळीकडे गर्द झाडी. रात्री टेन्टमध्ये एक कंदील व टेन्टसमोर एक अल्सेशियन कुत्रा बांधून छोट्या कॉटवर तो झोपत असे. वडिलांनी हे एक-दोन वेळा पाहिले व मग स्वतः त्याला भेटले. त्याच्याशी माझे वडील इंग्रजीत बोलले. वडिलांचे इंग्रजी चांगले होते. तो फ्लॉवरसाहेब थक्क झाला व खूषही झाला. थक्क अशासाठी की या गावात इंग्रजी बोलणारा कोणी भेटेल, ही कल्पनाच त्याला नव्हती व खूष अशासाठी की वडिलांनी त्याला राहण्यासाठी बंगल्यात बोलाविले व एक छान खोली दिली. पाण्याची, बाथरूमची, कॉटची, सर्व व्यवस्था छान करून दिली. तो खाण्यासाठी इकडून तिकडून काही व्यवस्था करीत असे. तेव्हा माझ्या आईने रोज त्याला शाकाहारी जेवणाचा डबा द्यायला सुरूवात केली. त्याला ते जेवण फार आवडत असे. 'व्हेरी टेस्टी' असे तो म्हणत असे. तो काटे, चमचे वापरत असे. पोळी कशी हाताने तोडायची, हे त्याला काही कळत नसे. मग माझ्या वडिलांनी आपल्या पद्धतीने कसे जेवायचे, हे त्याला शिकविले. त्याला मोठे कौतुक वाटायचे. पुढे पुढे

संध्याकाळी त्याची व माझ्या वडिलांची हिंदुधर्म, ख्रिश्चनधर्म यावर चर्चा चालायची. माझे वडील बायबल वाचतात, हे ऐकून त्याला मोठे आश्चर्य वाटायचे. माझे वडील हिंदुधर्माचे महत्त्व नेमके कशात आहे आणि तुमच्या व आमच्या धर्मात साधर्म्य कशात आहे, हे तौलनिक त्याला समजावून सांगत. तो लक्ष देवून ऐकायचा. हा युरोपियन इंजिनियर फार प्रेमळ, बहुश्रुत, जिज्ञासू, अभ्यासू व दिलदार होता. दिसायला सुंदर, सुदृढ, रुबाबदार व लालसर गोरापान. माझा थोरला भाऊ 'विठ्ठल' याला तो 'जॉनी' म्हणायचा. मी 'सदाशिव' म्हणून तो मला 'सनी' म्हणायचा व माझ्या धाकट्या बहिणीला 'थेलमा' म्हणायचा. दोन-तीन वर्षांनी त्याची बदली झाली. जाताना त्याला फार वाईट वाटले. त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. माझ्या आईवडिलांना त्याने अगदी वाकून नमस्कार केला व इंग्लंडचा, तो राहत असे, त्याचा पत्ता दिला व इंग्लंडला येण्याचे वडिलांना आवर्जून आमंत्रण दिले.

आमच्या शेजारी बंगल्यात वडिलांनी एका पारशी कुटुंबाला जागा दिली. त्यांना एक दोन-तीन वर्षांचा मुलगा होता. त्याचे नाव रोहिंग्टन. मुलगा गोरा, गुटगुटीत व फार गोड. आमच्या घरी नेहमी येत असे, दुडदुड धावत असे आणि खावून पळून जात असे. एक दिवस माझे वडील सोवळे नेसून पूजा करीत होते. हा रोहिंग्टन दुडदुड धावत आला व आमच्या वडिलांच्या मांडीवर गप्पकन बसला. वडील हसले व आनंदाने त्याला नीट मांडीवर बसवून पूजा करू लागले. ते माझ्या आईने पाहिले व हसून विचारले, "अहो, सोवळ्यात तो तुमच्या मांडीवर की हो बसला!" माझे वडील म्हणाले, "बसू दे, बसू दे. सोवळे हे मनाला. मनाची शुचिर्भुतता प्रथम. शरीराची नंतर, दुय्यम. लहान मुले फार निष्पाप व निर्व्याज असतात. त्यांचे मन किती शुद्ध आणि प्रेमळ. पाप नाही. लहान मुले ही देवाघरची फुले." आई काय बोलणार! तसे पाहिले तर माझ्या आईवडिलांची मते सारखीच होती.

आमच्या घरी पुष्कळ पोथ्या होत्या. श्रीधरपंतांचे रामायण, हरिविजय, धुंडिसुत मालुकवीचे नवनाथ, पांडवप्रताप, महाभारत, नाथांचे अध्यात्मरामायण, भागवत, संतचरित्रे, त्यांचे वाङ्मय वगैरे पुष्कळ साहित्य. मी नऊ-दहा वर्षांचा झालो तेव्हा माझ्या आईवडिलांनी सांगितले, "हे बघ, आपली रात्रीची जेवणे झाली की मग आम्हाला रोज एक अध्याय वाचून दाखवायचा." मग माझ्या थोरल्या भावाने व मी तसेच करायचे ठरविले. अध्याय वाचण्यापूर्वी आमच्या बंगल्यातील दहाबारा माणसे रोज अध्याय ऐकायला यायची. अध्याय वाचायला एक विशिष्ट स्वर व लय लावावा लागतो. तरच अध्याय सुश्राव्य होतो. हे मला व माझ्या भावाला जमले होते. मी रामायण घेवून संपविले की तो हरिविजय वाचायला घ्यायचा. आलटून-पालटून आम्ही अशा पोथ्या वाचीत असू. हे ग्रंथ प्रासादिक ग्रंथ आहेत. वाचताना मन मोहून जाते, रंगून जाते, प्रेम उचंबळून येते. असे वाटते, अध्याय संपूच नये, वाचतच रहावे. त्याची गोडी अवीट आहे, आनंदबहार आहे.

त्या काळात रेडिओ, टी.व्ही. असे काही नव्हतेच. थोडे प्रचलित होते ते ग्रामोफोन्स. जीवन अगदी शांत. धावपळ नाही. दगदग नाही. टेन्शन नाही. मतभेद नाहीत. भांडणे नाहीत. आम्ही रात्रीची वाट पहात असू. कारण वाचताना मन दंग होवून जायचे व आनंद मिळायचा तो वेगळाच.

सांगायचा मुद्दा असा की या सर्व वातावरणामुळे, आईवडिलांच्या आचरणामुळे व या वाचनामुळे माझ्या मनावर कळत-नकळत संस्कार घडत होते. याशिवाय वडिलांनी आणलेली पुष्कळ पुस्तके घरी होतीच. टिळकांचे गीतारहस्य अर्थात कर्मयोग, स्वामी विवेकानंदांची सर्वधर्मपरिषदेपुढील भाषणे, त्यांचे राजयोग, रामकृष्ण परमहंस यांची व्याख्याने, ज्ञानेश्वरी, तुकारामगाथा, दासबोध, गोंदवलेकर महाराजांची प्रवचने, बायबल, शिवाजीराजे यांचे चरित्र, नेपोलियन बोनापार्टचे चरित्र, हरि नारायण आपटे यांच्या कादंबऱ्या, नामांकित लेखक व कवी यांच्या इंग्रजी कादंबऱ्या व कविता अशी कितीतरी पुस्तके. वडील माझ्याकडून हे वाचून तर घ्यायचेच शिवाय शाळेतील अभ्यासाकडेपण लक्ष द्यायचे. त्याचबरोबर माझ्याकडून खूप शारीरिक व्यायामही करून घ्यायचे. जोर, दंड-बैठका, कुस्त्या, धावणे, पोहणे, वगैरे वगैरे. वाचन, अभ्यास, व्यायाम यांत थोडी जरी चालढकल त्यांना दिसली तरी माझे जेवण ते बंद करीत असत व माझी आईही त्यांचे पालन करीत असे. माझी शारीरिक, मानसिक, बौद्धिक वाढ उत्तम तऱ्हेने वडिलांना करवून घ्यायची होती. म्हणून त्यांनी सर्वतऱ्हेने प्रयत्न चालविले. पुढे पुढे मलाच त्या सर्वांची गोडी वाटू लागली. वडील जे करतात, ते सर्व आपल्याच कल्याणासाठी व उन्नतीसाठी आहे, ही भावना पक्की होत चालली. मुंढवे गावातील माझे मराठी शिक्षण संपले. इंग्रजी शिक्षणासाठी आम्ही पुण्यास रहावयास आलो. माझे नाव नूतन मराठी विद्यालयामध्ये घातले. गुण साठ टक्क्यावर असल्यामुळे तुकडी 'ए' मिळाली. वर्गातील सर्वच मुले साठ टक्क्याच्या वरची होती. त्यामुळे मॅट्रिकपर्यंत आम्ही सर्व त्याच तुकडीतून वरवर जात होतो. शाळेत असताना अभ्यास चांगला करायचा, रोज रात्री अध्याय वाचायचा व सकाळ-संध्याकाळ जिमखान्यावर जावून खूप व्यायाम करायचा. पहाटे चारला उठून पाचपाच सहासहा मैल पळत जायचे. काही महिने फर्ग्युसन टेकडी, काही महिने पर्वतीवर व काही महिने विठ्ठलवाडीकडे. परत जिमखान्यावर येऊन जोर-बैठका, कुस्त्या वगैरे. त्यामुळे शरीर घाटदार व पिळदार होत चालले.

शाळेत शिक्षक अगदी मन लावून शिकवायचे. ही मुले राष्ट्राची भावी संपत्ती आहे, या उदात्त विचारातूनच. ती तेजस्वी